

मासिक वार्तापत्र • अंक 24 • जानेवारी 2022 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

2008 च्या मालेगाव बॉम्बस्फोटातील हिंदुत्ववादी आरोपींना निर्दोष सिद्ध करण्याची तयारी! 3

'शक्ती कायद्या'तील बदलांनी खरोखर महिला सुरक्षित होतील का? 4

आधार आणि मतदार ओळखपत्र जोडून मतदानाच्या लोकशाही अधिकारावर हल्ल्याची पूर्वतयारी 14

## न्यायालय नाही, तर फक्त वर्ग-संघर्षच खरा न्याय देऊ शकतो!

### एस.टी. कामगारांनो, संघटित होण्याची हीच वेळ आहे!

**संपादक मंडळ**

एस.टी. कामगारांचा प्रदीर्घ संप एका कठीण वळणावर येऊन थांबला आहे. सर्व भांडवली पक्षांच्या दावणीला बांधलेल्या कामगार संघटनांनी माघार घेतली आहे, इतकेच नाही तर कामगारांना मागे येण्याचेही आवाहन केले आहे. परंतु कामगार माघार घेण्यास तयार नाहीत आणि स्वत:स्फूर्त पद्धतीने चालू झालेला हा संप कामगारांच्या निर्धाराने चालूच आहे. काही मूठभर कामगार मागे हटून कामावर परत गेले असले, तरी बहुसंख्यांक टिकून आहेत. सर्वच भांडवली पक्षांचे कामगार विरोधी आणि भांडवलधार्जिणे चरित्र या निमित्ताने उघडे पडले आहे, आणि आंदोलनाचे नेतृत्व हाती घेऊ पाहणारा भाजप सुद्धा उघडा पडला आहे. अशामध्ये जवळपास सर्वच कामगारांच्या आशा न्यायालयीन लढाईवर टिकलेल्या आहेत आणि न्यायालयच विलिनीकरण करवेल या आशेने ते बसलेले आहेत. हे आंदोलन एका कठिण वळणावर उभे असताना भारतातील भांडवली राज्यसत्तेच्या विविध अंगांचे खरे चरित्र ओळखण्यात आपण कमी पडलो, तर पदरी निराशाच येईल. तेव्हा फक्त एस.टी. कामगारांनीच नाही तर सर्वच कामगारवर्गाने या लढ्याच्या सकारात्मक बाजूंकडून आणि राहिलेल्या कमतरतांमधून योग्य धडा घेणे गरजेचे आहे. त्यापुढे जाऊन एस.टी. कामगारांनी आपल्या लढ्याच्या सांघटनिक आणि विचारधारात्मक कमजोरींना ओळखून आणि त्यांच्याशी लढूनच, आपले शत्रु-मित्र योग्यरित्या जाणूनच लढा यशस्वी होऊ शकतो हे जाणणेही गरजेचे आहे.

**न्यायालयांच्या मर्यादा जाणा!**

न्यायालयांचे काम आहे प्रस्थापित भांडवली वैधानिक चौकटीच्या आधारावर, प्रस्थापित कायद्यांच्या आधारावर निर्णय घेणे. आजवर देशातील न्यायालयांनी खाजगीकरणाविरोधात निकाल दिले आहेत का? न्यायालयांनी एखाद्या सेवेच्या शासकियीकरणाचा निकाल दिला आहे का? कधीच नाही! न्यायालयांनी शासकीय धोरणांमध्ये हस्तक्षेप करण्यास सतत नकारच दिला आहे, इतकेच नाही तर अनेकदा त्यांनी खाजगीकरणाची तळी उचलून धरली आहे. न्यायालयांनी निकालांतुन हे सुद्धा स्पष्ट केले आहे की काम करत असलेल्या आस्थापनांची मालकी सरकारची असावी की खाजगी हे ठरवण्याचा कुठलाही कायदेशीर अधिकार कामगारांना नाही. "मेस्मा" सारखे दडपशाही करणारे कायदे न्यायालयांनी असंवैधानिक ठरवले नाहीत. कामगारांच्या संपाना बेकायदेशीर ठरवण्याचे कामही अनेकदा न्यायालयांनी केले आहे. तेलंगणा मधील एस.टी. कर्मचाऱ्यांच्या लढ्यामध्ये सुद्धा उच्च न्यायालयाने कामगारांवरील कारवाई करण्याची परवानगी महामंडळाला दिली, खाजगी वाहतुक चालवण्याची सरकारला परवानगी दिली. महाराष्ट्रातील एस.टी. कामगारांच्या संपाबद्दलही कामगारांचे प्रतिनिधीच नसलेल्या त्रिसदस्यीय समितीला न्यायालयाने मान्यता दिली आहे. असे सर्व असताना इतिहासाकडून न शिकता, भारतातील न्यायव्यवस्थेचे योग्य मूल्यमापन न करता, न्यायालयाकडून एस.टी. कामगारांनी लावलेली आशा वास्तवाशी पूर्णपणे विसंगत

पान 6 वर

## पंजाबमध्ये केजरीवाल आणि चन्नीमध्ये 'आम आदमी' बनण्याकरिता चालू आहे हास्यास्पद स्पर्धा!

**शुभम**

पंजाब मध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत आणि निवडणुका जवळ पाहताच विविध भांडवली निवडणूकबाज पक्षांमध्ये हालचालू चालू झाल्या आहेत. या सर्व पक्षांचे नेते-मंत्री गेली पाच वर्षे चालू असलेल्या कुंभकर्णी झोपेतून बाहेर आले आहेत आणि आता मात्र एकेक करत घोषणा करत सुटले आहेत. अशा घोषणांच्या नादातच पंजाबचे सध्याचे काँग्रेसचे मुख्यमंत्री चरणजीत सिंह चन्नी आणि दिल्लीचे आम आदमी पक्षाचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यामध्ये हे दाखवण्याची अहमहमिका चालू झाली आहे की या दोघांपैकी कोण जास्त सामान्य माणूस आहे! नोव्हेंबर महिन्यापासून केजरीवाल पंजाबच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये चक्कर टाकून आले आहेत. याच दरम्यान लुधियाना शहरात झालेल्या दोन वेगवेगळ्या कार्यक्रमांदरम्यान दोघेही रिक्षावाल्यांच्या आणि पथारीवाल्यांच्या जवळ जाताना दिसून आले आहेत. एकीकडे चन्नीने रिक्षावाल्यांसोबत चहा पिला तर केजरीवाल त्यांच्यासोबत जेवण करताना दिसून आले. निवडणुकांच्या अगोदर अशा प्रकारचे कारनामे तर नेहमीच बघायला मिळतात, आणि असे दिखावे फक्त राजकीय स्टंटबाजी सोडून काही नसते (उत्तरप्रदेशात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सुद्धा दलितांच्या घरी जेवण करताना दिसताहेत, आणि जनता ही स्टंटबाजी आता पुरती ओळखू लागली आहे!). हे दोन्ही नेते आणि त्यांचे पक्ष किती सामान्य आहेत, ते जरा बघूयात.

2017 मध्ये राज्यातील बेरोजगारी, गरिब शेतकऱ्यांवरचे संकट, ढासळती अर्थव्यवस्था आणि दलितांविरोधात वाढते अत्याचार अशा मुद्यांना केंद्रस्थानी ठेवून काँग्रेसने अकाली दल व भाजपच्या तत्कालीन युती सरकारला निवडणुकीत हरवले आणि सत्तेवर आली. लक्षात घ्या की यापैकी एकाही मुद्यावर काँग्रेस सरकारने एकही ठोस पाऊल उचललेले नाही आणि अनेक मामल्यांमध्ये तर स्थिती पूर्वीपेक्षा खराब झालेली आहे.

पंजाबच्या काँग्रेस सरकारने 'घरोघरी नोकरी' योजने अंतर्गत प्रत्येक घरात एकेक नोकरी देण्याची जुमलेबाजी केली होती. योजनेमध्ये 10 लाखांहून जास्त युवकांनी नोंदणी केली पण सरकारने किती जणांना नोकरी दिली याचे आकडे कधी समोर आलेच नाहीत. नवीन रोजगार निर्माण करणे तर दूरच, सरकारी विभागांमध्ये जागा सुद्धा या सरकारने भरल्या नाहीत. 2020 मध्ये माहिती अधिकाराच्या कायद्या अंतर्गत समोर आलेल्या माहितीमध्ये समजले आहे की पंजाब आणि चंडीगढ मध्ये प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांच्या 10 टक्क्यांपेक्षा जागा रिकाम्या आहेत. इतर अनेक सरकारी खात्यांमध्ये अशाच हजारो जागा रिकाम्या आहेत ज्यांना काँग्रेस सरकारने आपल्या कार्यकाळात भरलेलेच नाही. 2017 ते 2021 या काळात पंजाबमध्ये बेरोजगारीचा दर अनुक्रमे 5.61 टक्के, 8.15 टक्के, 10.3 टक्के, 10.98 टक्के, आणि 7.1 टक्के राहिला आहे. 2019 आणि 2020 मध्ये पंजाबमधील सरासरी बेरोजगारीचा दर भारताच्या बेरोजगारी दरापेक्षा जास्त होता आणि पंजाब सर्वाधिक बेरोजगारीच्या पाच राज्यांमध्ये राहिला आहे.

पान 7 वर

## आंदोलनाचा परिणाम: बांधकाम कामगारांच्या रखडलेल्या नोंदण्या पुन्हा चालू!

# महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनच्या नेतृत्वात बांधकाम कामगार होताहेत संघटित!

✍बिगुल पत्रकार

महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनतर्फे 31 ऑगस्ट 2020 रोजी केलेल्या आंदोलनाच्या परिणामी कामगारांच्या रखडलेल्या नोंदण्या पुन्हा चालू झाल्या आहेत आणि शेकडो कामगारांच्या नोंदण्या पूर्ण होऊन त्यांना नोंदणी प्रमाणपत्रही मिळाले आहे.

पुणे शहरातील कात्रज, बिबवेवाडी परिसरातील अप्पर डेपो कामगार नाका, गोकुळ नगर कामगार नाका, कात्रज कामगार नाका आणि दत्तनगर कामगार नाका येथे काम करणाऱ्या असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांनी रखडलेल्या नोंदण्या पूर्ण व्हाव्यात आणि "रोजगाराच्या हमीचा" कायदा सरकारने करावा या मागण्यांना घेऊन 31 ऑगस्ट 2021 रोजी भव्य आंदोलन केले होते. पुणे शहरातील मजुर अड्ड्यांवरील कामगारांनी कामगार नाके बंद ठेवून, संप करून केलेले हे पहिलेच आंदोलन होते.

कामगारांचा प्रचंड संताप आणि एकजूट पाहता कामगार आयुक्त कार्यालयातर्फे नोंदणी प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. आंदोलनाच्या पुढील आठवड्यांमध्येच सरकारी कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मजुर नाक्यांवर हजेरी लावून कामगारांना नोंदणी प्रक्रियेबद्दल माहिती दिली आणि ऑनलाईन अर्ज कसे भरावेत याबद्दलही मांडणी केली. यानंतर युनियन द्वारे केलेल्या नोंदण्या ज्या रखडवलेल्या होत्या त्यापैकी दोनशेच्या वर कामगारांच्या नोंदण्या पूर्ण होऊन त्यांना नोंदणी कार्ड आणि टूलकिटची पेटी आता मिळाली आहे.

या निमित्ताने बोलताना युनियनचे अध्यक्ष परमेश्वर जाधव यांनी मांडले की बांधकाम कामगारांची मजुरी बुडवली जाणे सर्रास होत असते आणि विशेषत: लॉकडाऊन नंतरच्या काळात यात मोठी वाढ झाली आहे. युनियनने या संपूर्ण काळात कामगारांच्या वतीने हस्तक्षेप करत ठेकेदार-बिल्डराना युनियनच्या शक्तीची आणि त्यांच्या जबाबदारीची जाणीव करवून देत शेकडो कामगारांच्या बुडवलेल्या मजुरी पुन्हा मिळवून दिल्या आहेत. काही कामगारांची प्रकरणे कामगार आयुक्त कार्यालयात प्रलंबित आहेत आणि त्यांचा नियमित पाठपुरवठा चालू आहे.

नोंदणी प्रक्रिया पुन्हा चालू झाल्यामुळे, आणि मजुरी वसूल करण्याच्या अनुभवातून लढल्या शिवाय काहीच मिळत नाही हे पुन्हा एकदा दिसून आले आहे आणि लढून जिंकल्याच्या उत्साहामुळे, तसेच युनियनच्या लोकशाही कारभाराच्या पद्धतीमुळे युनियनच्या सदस्यसंख्येमध्ये जोमाने वाढही होत आहे. महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन ही त्या मोजक्या युनियन्सपैकी अशी असंघटित क्षेत्रातील युनियन आहे जी नियमितपणे कामगारांच्या स्तरोन्नयनाकरिता, शिक्षणाकरिता विविध मुद्यांवर अभ्यासवर्ग आयोजित करत असते; त्यासोबतच जनपक्षधर डॉक्टरांच्या मदतीने वैद्यकीय शिबिरे, आणि बांधकाम कामगारांच्या जीवनाला प्रभावित करणाऱ्या सामाजिक-राजकीय मुद्यांवर सतत आंदोलनही करत असते असेही त्यांनी मांडले. गेल्या 3 महिन्यांमध्ये युनियनने सतत कामगारांकरिता बेरोजगारी, महागाई, शेतकरी आंदोलनाचे धनिक शेतकरी धार्जिणे वर्ग चरित्र अशा प्रश्नांवर अभ्यासवर्गांचे आयोजन केले आहे. तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात, जातीय अत्याचारांविरोधात आवाज उठवण्यासोबतच एस.टी. कामगारांच्या संपाला सक्रिय पाठिंबा सुद्धा दिला आहे आणि कामगार एकजुटीला पुढे नेले आहे. युनियनचे कामकाज लोकशाही पद्धतीनेच चालते आणि कामगार कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागातूनच सतत विस्तार झाला आहे आणि आता एक हजारांवर कामगार युनियनचे सदस्य झाले आहेत असेही परमेश्वर यांनी मांडले.

ऑनलाईनचा आग्रह सोडून सरकारने नोंदणी मजूर नाक्यावर येऊन केली पाहिजे ही मागणी अजूनही पूर्ण झालेली नाही; तसेच प्रत्येकाला रोजगाराच्या अधिकाराची मागणी ही कामगारांची सर्वात प्रमुख मागणी आहे. परंतु या मागण्यांना मिळवायचे असेल तर प्रचंड मोठ्या प्रमाणात कामगारांची एकजूट साध्य केल्याशिवाय आणि झुंझार लढा उभा केल्याशिवाय ही मागणी पूर्ण होऊच शकत नाही याची जाणीव आम्हाला आहे, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन त्याकरिता कटिबद्ध आहे आणि येत्या काळात इतर समविचारी संघटनांसोबत मिळून या मागणीभोवती निरंतर वाढत जाणारे आंदोलन युनियन उभे करेल असा विश्वासही परमेश्वर यांनी व्यक्त केला.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


•रुम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 8669735643


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

### बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp

चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

# हे सर्व खोटे आहे! हे कधीच घडले नव्हते! आता 2008 च्या मालेगाव बॉम्बस्फोटातील हिंदुत्ववादी आरोपींना निर्दोष सिद्ध करण्याची तयारी!

`अविनाश

2008 च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील आणखी एक साक्षीदार पलटला आहे आणि हा आतापर्यंतचा पलटणारा 15 वा साक्षीदार आहे. या प्रकरणात आतापर्यंत 220 जणांची साक्ष झाली आहे. साक्षीदाराने दावा केला की महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ए.टी.एस.) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह पाच आर.एस.एस. कार्यकर्त्यांची नावे देण्यासाठी दबाव आणला होता. यानंतर योगी आदित्यनाथ आणि साध्वी प्रज्ञा यांनी हे सर्व काँग्रेसचे षडयंत्र असल्याचे वक्तव्य केले आहे. उत्तरप्रदेशातील निवडणुका तोंडावर असतानाच एखाद्या साक्षीदाराचे असे वक्तव्य येणे या योगायोग नाहीच!

परंतु या गोष्टींचा सरळ अर्थ असाच काढावा लागेल की, देशात मुस्लिम कट्टरतावादाखाली मुस्लिम दहशतवाद अस्तित्वात आहे आहे, पण हिंदू कट्टरतावादाखाली हिंदू दहशतवाद अस्तित्वातच नाही! थोडक्यात, संघीचे-धार्मिक हिंसाचार, हे हिंसाचार नव्हेतच! देशभरात होत असलेल्या दंगली, गायीच्या नावावर मॉब-लिंचिंग, जामिया ते जेएनयूपर्यंतचा हिंसाचार, हे सर्व खोटे आहे, केवळ मनाची कल्पना आहे. नुकतेच बाबरी मशिद पाडण्याच्या मुद्द्यावरही तेच पाहायला मिळाले. ज्यामध्ये 28 वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर उच्च न्यायालयाचा निर्णय आला, ज्यामध्ये सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. यातील अनेक आरोपी सुनावणीपूर्वीच हे जग सोडून गेले होते. अशा स्थितीत जे या निर्णयांकडे मोठ्या आशेने डोळे लावून बसले होते आणि संविधान आणि 'न्यायपालिकेची निष्पक्षता' यावर बोलताना थकत नव्हते, ते बसून अश्रू ढाळत होते. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातही, सत्तेवर आल्यानंतर संघपरिवारातर्फे आपले जुने काळे कारनामे धुवून काढण्यासाठी सत्ता यंत्रणेला कामाला लावले जात आहे.

## मालेगाव बॉम्बस्फोट घटना आणि तपास

8 सप्टेंबर 2006 रोजी मालेगाव मध्ये एका मशिदीजवळ साखळी बाँब स्फोट झाले. बळी पडलेले बहुसंख्य व्यक्ती मुस्लिम होते. महाराष्ट्र ए.टी.एस. ने लागलीच त्याचा आरोप स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) वर लावला. लश्कर-ए-तय्यबा सारख्या दहशतवादी संघटनेचे नावही समोर आले. अगोदरच्या तपासाचा भाग म्हणून सिमी आणि हुजी संघटनांशी संबंधित काही जणांना अटक केली गेली. पण नंतरच्या तपासातून समोर आलेल्या तथ्यांमुळे 2013 मध्ये हिंदू अतिरेकी संघटना 'अभिनव भारत' वर आरोप लावले गेले. यादरम्यान 2008 मध्ये पुन्हा बाँबस्फोट झाले, जे महाराष्ट्रभर झालेल्या बाँबस्फोट मालिकांचा हिस्सा होते. या स्फोटांकरिता वापरलेल्या एका मोटारसायकलीची मालकी "साध्वी" प्रज्ञा सिंह यांची आहे हे नंतर तपासात दिसून आले. (या प्रज्ञा सिंह अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माजी सदस्य आणि सध्या भाजपच्या खासदार आहेत.) महाराष्ट्र ए.टी.एस., जिचे नेतृत्व मुंबई दहशतवादी हल्ल्यामध्ये प्राण गमावलेल्या हेमंत करकरे यांच्याकडे होते, त्यांनी साध्वी प्रज्ञा यांना अटक केली. 24 ऑक्टोबर 2008 रोजी पोलिसांनी साध्वी प्रज्ञा सिंह ठाकुर, श्याम भवरलाल साहू आणि शिव नारायन गोपाल सिंह कालसंघरा यांना या संदर्भात अटक केली. तपासामध्ये 'राष्ट्रीय जागरण मंच', 'हिंदू राष्ट्र सेना', 'शारदा सर्वज्ञ पीठ', 'अभिनव भारत' अशा हिंदुत्त्ववादी संघटनांची नावे पुढे आली. 4 नोव्हेंबर 2008 रोजी सैन्यातील लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांना अटक केली गेली. आजपर्यंत या केस मध्ये प्रज्ञा ठाकूर, मेजर रमेश उपाध्याय, प्रसाद पुरोहित, समीर कुलकर्णी, राकेश धावडे, सुधाकर द्विवेदी उर्फ दयानंद पांडे, सुधाकर



चतुर्वेदी, प्रवीण टाकळकी, रामचंद्र कलसांगरा, संदीप डांगे, शिवनारायण कलसांग्र, श्याम साहू, राजा राहिरकर आणि जगदीश म्हेत्रे यांच्यावर गुन्हा दाखल केला गेला आहे. आरोपींना वाचवण्याकरिता हिंदू महासभा, शिवसेना, आर.एस.एस. यांनी जाहीर पाठिंबा देत निधी सुद्धा उभा केला आहे. हेमंत करकरे यांच्या नेतृत्वाखालील ए.टी.एस. ने पक्षपाती तपास केला आहे आणि त्यांच्याकडून तपास काढून घ्यावा अशी मागणी भाजप नेत्यांनी अगोदरच सुरू केली होती.

## तपास यंत्रणांमध्ये संघाची घुसखोरी, आणि एन.आय.ए.द्वारे तपासाला खड्ड्यात घालण्याचे काम

गृह मंत्रालेयाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय तपास संस्थेने (एन.आय.ए.) 13 एप्रिल 2011 रोजी या प्रकरणाचा ताबा घेतला आणि ते अजूनही या प्रकरणाचा "तपास" करत आहेत. एन.आय.ए. ही संस्था केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली काम करते. या संस्थेमध्ये हिंदुत्ववादी विचारांच्या अधिकाऱ्यांद्वारे विविध तपासांना बारगळवण्याचे काम केले जात आहे असे आरोप तर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनीही केले आहेत. 2014 साली मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर तर एन.आय.ए. ने या तपासाला व्यवस्थितपणे रसातळाला नेले आहे.

एप्रिल 2015 मध्ये, खालच्या न्यायालयाने एन.आय.ए. च्या तपासाच्या आधारावर प्रज्ञा ठाकूर आणि कर्नल पुरोहित यांच्यावरील महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मकोका, MCOCA) अंतर्गत आरोप मागे घेतले. परंतु उच्च न्यायालयाने हा निर्णय फिरवत आरोप पुन्हा तसेच ठेवण्याचा आदेश दिला. यावर सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश बाजूला ठेवला आणि मकोका चे आरोप वगळले. दोघांवरील मकोकाचे आरोप फेटाळले गेल्यामुळे त्यांच्या गुन्ह्यातील सहभागाला सिद्ध करणे अजूनच अवघड झाले. न्यायालयाने राकेश धावडे यावरील मकोकाचे आरोप मागे घेतले नाहीत. मकोका अंतर्गत धावडेच्या साक्षीने या दोघांनाही शिक्षा होऊ शकली असती, परंतु त्यांच्यावरील आरोपच फेटाळले गेल्यामुळे तो मार्ग आता बंद झाला.

जून 2015 मध्ये या प्रकरणात सरकारी वकील असलेल्या रोहिणी सलियान यांनी जाहीर वक्तव्य केले की मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर मला हिंदुत्ववाद्यांविरोधातील खटल्यांमध्ये नरमाई ठेवण्यास सांगितले जात आहे! जे. जे. शूटआऊट, भारत शहा, मुलुंड बॉंबस्फोट असे महत्वाचे खटले सांभाळलेल्या वरिष्ठ वकिलांचे वक्तव्य सरळ दाखवते की या प्रकरणाला दाबून टाकण्याचे पूर्ण प्रयत्न मोदी सरकारने चालू केले होते. त्यांना या केस मधून हटवले गेले.

25 एप्रिल 2016 रोजी, न्यायालयाने यापूर्वी अटक केलेल्या नऊ मुस्लिमांची सुटका केली आणि एटीएसचे प्राथमिक आरोप बनावट असल्याचे मांडले. हे सर्व प्रज्ञा सिंह ठाकुरला कथितरित्या आरोपी दाखविणारे व्हिडिओ सादर केल्यानंतर आठ वर्षांनी झाले आहे! थोडक्यात या मुस्लिम तरुणांच्या आयुष्याची 8 वर्षे फक्त कोर्टाच्या प्रक्रियेने वाया घालवली. काहीही पुरावा नसल्यामुळे एन.आय.ए. कडे ही केस मागे घेण्याशिवाय पर्यायही उरलेला नव्हता.

मे 2016 मध्ये, एन.आय.ने मकोका अंतर्गत या प्रकरणात पुरवणी आरोपपत्र दाखल केले, आणि त्यामध्ये ठाकूर आणि इतर पाच जणांविरुद्ध आरोप काढुन टाकले! यानंतर आरोपींनी जामिनासाठी अर्ज केला. तथापि, जून 2016 मध्ये, एन.आय.ए. न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला. यानंतर प्रज्ञा ठाकूर जामिनासाठी उच्च न्यायालयात गेल्या. आरोप पत्राचे वैशिष्ट्य असे की एन.आय.ए. ने एकाप्रकारे महाराष्ट्र ए.टी.एस. लाच दोषी ठरवत असा आरोप लावला आहे की त्यांनी आरोपींना यातना देऊन त्यांच्याकडून माहिती काढली होती! थोडक्यात ए.टी.एस. ने केलेल्या तपासाला उलटे फिरवण्याचे काम एन.आय.ए. ने चालू केले.

जामिनाच्या अर्जावर एन.आय.एन. ने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की आता आरोपपत्र दाखल झालेले असल्यामुळे त्यांना आरोपींच्या ताब्याची गरज नाही. यानंतर उच्च न्यायालयाने 25 एप्रिल 2016 रोजी प्रज्ञा ठाकूर यांचा जामीन अर्ज मंजूर केला, परंतु कर्नल पुरोहित आणि सुधाकर द्विवेदींचा अर्ज मात्र स्विकारला नाही.

ठाकूर यांनी आपल्या नव्या याचिकेत उच्च न्यायालयासमोर युक्तिवाद केला की ऑक्टोबर 2008 मध्ये अटक झाल्यापासून त्यांची प्रकृती सतत खालावत चालली होती आणि एटीएसच्या तपासादरम्यान त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. आरोग्याचे निमित्त करून प्रज्ञा ठाकूर जामिनावर स्वतंत्र फिरत आहेत, परंतु त्यानंतर समोर आलेल्या अनेक व्हिडिओ मध्ये दिसत आहे की त्या कब्बडी, क्रिकेट, आणि गरबा खेळत आहेत, लग्नांना हजेरी लावत आहेत! असे असतानाही एन.आय.ए. ने जामीन रद्द करण्यासाठी काहीही पावले टाकलेली नाहीत.

यानंतर एकेक करत साक्षीदारांचे कोर्टासमोर उलटणे चालू झाले आहे. जानेवारी 2017 मध्ये एक निलंबित ए.टी.एस. अधिकारी म्हणाला की कलसंगरा आणि संदीप डांगे यांना तर ए.टी. एस. ने मारून टाकले आहे, परंतु त्यांच्यावर तरीही गुन्हे आहेत. दिलीप पाटीदार हा कर्नल पुरोहितशी जोडलेला साक्षीदार अनेक वर्षांपासून बेपत्ता आहे.

हे स्पष्ट आहे की एन.आय.ए. ने तपासाला पूर्ण बारगळवले आहे आणि हिंदुत्ववादी नेत्यांना सोडवण्याची जमीन तयार करवली आहे.

## इतर प्रकरणांनाही असेच दाबले आहे

याचप्रमाणे 2007 च्या अजमेर बॉम्बस्फोट प्रकरणात तपास बारगळवला आहे. ऑक्टोबर 2007 मध्ये राजस्थानमधील अजमेर दर्गा एका स्फोटाने हादरला होता ज्यात तीन लोक ठार झाले होते. सुरुवातीला परकीय हात असल्याचा संशय व्यक्त केला जात होता, परंतु लवकरच हा दोष हिंदू धर्मांधांवर गेला. स्वामी असीमानंद यांच्यावर या हल्ल्याचा सूत्रधार असल्याचा आरोप होता, तर संघाचे वरिष्ठ कार्यकर्ता इंद्रेश कुमार यांचेही नाव तपासादरम्यान समोर आले. तथापि, एन.आय.ए. च्या तपासाचे वास्तव तेव्हा दिसून आले जेव्हा 24 साक्षीदार - ज्यापैकी अनेक साक्षीदार या खटल्यासाठी महत्त्वपूर्ण होते - फितुर झाले. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, झारखंडचे कृषी मंत्री रणधीर सिंग आणि गोवर्धन सिंग हे देखील फिरले होते. अखेर 26 साक्षीदार फितुर झाल्यानंतर न्यायालयाने असीमानंद आणि इतर सहा जणांना या खटल्यातून दोषमुक्त केले.

एनआयए मोदी सरकारच्या तालावर नाचत त्यांच्या इच्छेनुसार कसे काम करते याचे आणखी एक उदाहरण. 2007 च्या मक्का मशीद बॉम्बस्फोट प्रकरणात हैदराबाद येथील राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष न्यायालयाने पुराव्याच्या अभावी पाचही जणांची निर्दोष मुक्तता केली.

## फॅसिझम भांडवलदार वर्गाचा पाळलेला कुत्रा, कामगार वर्गाचा कट्टर शत्रू आहे!

सरकारी संस्थांचे एक हिंदुत्ववादी-संघी

पान 8 वर

# ‘शक्ती कायद्या’तील बदलांनी खरोखर महिला सुरक्षित होतील का?

अश्विनी

महिला व बालकांवरील वाढत्या अत्याचारांवर आळा घालण्यासाठी ‘शक्ती कायदा’ विधिमंडळात पारित झाला आहे. कडक कायदा केल्यामुळे महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा बसेल या प्रचलित लोकप्रिय तर्काला धरून हा “कडक” कायदा केला गेला आहे. परंतु या कायद्याच्या निमित्ताने हा प्रश्न उपस्थित करणे गरजेचे आहे की अशा पण मुळात कडक कायदे केल्याने महिला सुरक्षित होऊ शकतात का, आणि शक्ती कायद्याच्या मर्यादा काय आहेत? शक्ती कायदा एकीकडे महिला अत्याचारांच्या समस्येच्या मुळाशी न जाता फक्त ‘कडक शिक्षेच्या’ तर्कावर आधारित आहे, दुसरीकडे या काद्यातील बऱ्याचशा तरतुदी तर महिलाविरोधी आहेत! आपण अगोदर शक्ती कायद्यातील चुकीच्या तरतुदींवर बोलूयात आणि त्यानंतर कडक कायद्यांबद्दल.

## शक्ती कायद्याची अव्यवहार्यता

महिला व बालकांवरील वाढत्या अत्याचाराबाबत अस्तित्वातील कायदे तकलादू आहेत आणि त्यांचीही योग्य अंमलबजावणी होत नाही, या तर्काच्या पार्श्वभूमीवर 2020 च्या हिवाळी अधिवेशनात “शक्ती कायदा” विधेयक मांडले गेले. हैदराबादमधील डॉ. प्रियंका रेड्डीच्या अमानुष बलात्कार करून हत्येनंतर देशभर तीव्र पडसाद उमटले होते; परिणामी अधिक कडक कायदे करण्याची गरज दर्शवून आंध्र प्रदेश सरकारने “दिशा”कायदा केला ज्यात महिलांवरील प्रत्येक प्रकारच्या छोट्या मोठ्या अन्याय अत्याचारांवर कडक कारवाईच्या तरतुदी होत्या. या कायद्याला अजून राष्ट्रपतींची संमती मिळणे बाकी आहे. या दिशा कायद्याचेच अनुकरण महाराष्ट्रात “शक्ती कायदा” गेल्या अधिवेशनात प्रस्तुत करण्यात आला आणि तो पारित देखील झाला. महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ (महाराष्ट्र अमेंडमेंट) ॲक्ट 2020 आणि “स्पेशल कोर्ट ॲंड मशिनरी फॉर इंप्लिमेंटेशन ऑफ महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ 2020” अशी दोन विधेयके विधिमंडळासमोर मांडण्यात आली होती.

या कायद्यात प्रस्तावित तरतुदींमध्ये 15-21 दिवसाच्या आत आरोपपत्र दाखल करणे, 30 दिवसात सुनावणी पूर्ण करणे; आवश्यक माहिती न पुरवणाऱ्या इंटरनेट वा मोबाईल सेवा पुरवठादारांना शिक्षा; बलात्कार आणि ॲसिड हल्ल्यांपासून ते इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर महिलांवर होणाऱ्या छळवणुकीकरिता अनेक वर्षे ते आजन्म जन्मठेपेपर्यंत शिक्षा आणि दंड; तर अपवादात्मक बलात्काराच्या घटनांमध्ये फाशीच्या शिक्षेची तरतूद देखील करण्यात आली आहे. परंतु खोटी तक्रार सिद्ध झाल्यास तक्रारकर्तीलाही 1 ते 3 वर्षाच्या शिक्षेसोबतच 1 लाखाच्या दंडाची देखील तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.

आता 60 दिवस शोधमोहीम चालूनही कित्येक प्रकरणांचा तपास होऊ शकला नसताना 21 दिवसात तपास होऊन शिक्षा होण्याची तरतूद काय साध्य करेल? करियरमध्ये कतृत्व सिद्ध करू पाहणारे पोलिस पुरेसे पुरावे नसताना आरोपीला किंवा अनेकदा निरपराधांनाच धरतील आणि कोर्टासमोर केसेस तकलादू उभ्या राहून आरोपी सुटतील. बरं, अशा गुन्ह्यांच्या तपासासाठी अतिरिक्त कर्मचारी भरतीची तर काही तरतूद नाही. मग 21 दिवसात तपास कसा पूर्ण होणार? थोडक्यात गुन्हे सिद्ध होणे आता अजून अवघड होईल.

बलात्काराच्या घटनांमध्ये आरोप सिद्ध करण्याचे आह्वानच मोठे असते. बहुतांशी घटनांमध्ये घटनास्थळी फक्त दोन व्यक्ती असतात: आरोपी आणि पीडिता. आरोपी गुन्ह्याचे असतील नसतील ते सर्व पुरावे नष्ट करून फरार झालेला असतो. हाथरस सारख्या बलात्काराच्या घटनांमध्ये तर पुरावे नष्ट करण्यासाठी आणि आरोपीला वाचवण्यासाठी सत्ताधारी सुद्धा आकाशपाताळ एक करतात. अशा वेळेस कितीही प्रयत्न करूनही पीडिता आरोप सिद्ध करू शकत नाही. त्याउलट पीडीत महिलेच्या चारित्र्यावर संशय घेणारी आणि त्यानिमित्ताने महिलांवरच बंधनांची भाषा बोलणारी पितृसत्तावादी लगेच पुढे येतात. महिलांनी घरातच राहावे, रात्री उशिरापर्यंत बाहेर फिरू नये, मुलांशी बोलू नये, दात काढून हसू नये, छोटे स्कर्ट्स वा इच्छेप्रमाणे कपडे घालू नये, मोबाईल वापरू नये अशी सर्व पोपटपंची लगेच चालू होते. आता अशामध्ये गुन्हा दाखल करायला गेलेल्या महिलेलाच तक्रार खोटी निघाल्यास 3 वर्षासाठी तुरुंगात टाकणारी तरतूद शक्ती कायद्यात आहे. समाजाचा दबाव आणि कायद्याचा बडगा अशा स्थितीत तर गुन्हा नोंदवायलाही महिला पुढे धजणार नाहीत. थोडक्यात महिला अत्याचारांच्या गुन्ह्यांच्या नोंदींचा आकडा घटवण्याच्या कामी ही तरतूद येणार आहे!



शक्ती कायद्याच्या एका तरतुदीनुसार अत्याचार झाल्यावर पीडितेला सामाजिक व मानसिक आधार देण्यासाठी सेवाभावी संस्थांना अधिसूचित करण्याबद्दल तरतूद आहे. परंतु झालेल्या अत्याचारातून पुन्हा नवीन आयुष्य उभारण्यासाठी, स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, त्याच समाजात जाऊन राहण्यासाठी, आर्थिक आधार देऊन त्या व्यक्तीला पुन्हा उभे करण्यासाठीची तरतूद या कायद्यामध्ये नाही. स्वयंसेवी संस्था, ज्या मुख्यत्वे कॉर्पोरेट आणि सरकारी निधीवर चालतात, त्या काही प्रमाणात मानसिक व सामाजिक आधार देण्याचे काम करतात, परंतु प्रश्न तर अशा व्यक्तींना समाजात पुन्हा स्वबळावर जीवन जगता येण्याचा आहे. त्याबाबतीत कोणतीही ‘शक्ती’ हा कायदा पुरवत नाही.

यापुढे, वैवाहिक बलात्काराबद्दल ‘ब्र ’ सुद्धा न काढणारा हा कायदा आहे. भारतात तर नवऱ्याने बायकोला तिच्या मर्जीविरोधात हात लावायला समाजमान्यताच आहे! एकदा का लग्न झाल्यानंतर समाजमान्यतेने पुरुषाच्या दावणीला स्त्री बांधली गेली की मग तिच्या अस्तित्वावर उरते ती पुरुषाची हुकूमत. कोणत्याही व्यक्तीचा शेवटचा किल्ला म्हणजे तिचे शरीर असते आणि पुरुष असो वा महिला वा इतर लिंगी व्यक्ती, प्रत्येकाला त्याच्या शरिरावर पूर्ण हक्क आहे या व्यक्तिस्वातंत्र्याच्या अत्यंत मूलभूत कल्पनेलाही भारतात मान्यता नाही. शक्ती कायद्याने कोट्यवधी महिलांना त्यांच्या नवऱ्याने केलेल्या अत्याचाराविरोधात बोलण्याचीही तरतूद केलेली नाही.

एकंदरीत गुन्हे तपासात ढिलाई, महिलेला गुन्हा दाखल करण्यास परावृत्त करणे, आणि लढणाऱ्या व्यक्तीस कोणताही खात्रीशीर भौतिक आधार न देणारा हा कायदा काय सिद्ध करेल ते स्पष्ट आहे. परंतु समस्या एवढीच नाही. प्रश्न हा आहे की कितीही कडक कायदे केल्याने काय गुन्हे बंद होतील का?

## कडक कायद्यांनी समस्या सुटणार नाही!

गुन्हेगाराला जास्तीत जास्त कडक शिक्षा द्या, “फासावर लटकवा” असा ओरडा सर्वत्र चालतो. तसे तर महिलांवर वाढत्या गुन्ह्यांची खरी सामाजिक-आर्थिक कारणे मुळाशी जाऊन शोधण्याच्या प्रयत्नाची अपेक्षा सरकारकडून करणे तर व्यर्थ आहे. परंतु त्या उलट जनतेचा वाढता आक्रोश शांत करण्यासाठी कडक कायद्यांच्या तर्काचा वापर करून जनतेच्या क्रोधाला सुडाच्या भावनेत परिवर्तित केले जात आहे. दिल्लीतील निर्भया हत्याकांडानंतर संपूर्ण देश रस्त्यावर उतरला होता, ज्यानंतर आरोपींना गजाआड करून आणि असलेल्या कायद्यात सुधारणा करून सुमारे 7 वर्षानंतर आरोपींना फासावर लटकवले गेले. तरीही अशा घटना घडतच आहेत. शक्ती कायदा लागू झाल्यानंतर राज्यभर जल्लोष चाललाय की आता तरी महिला अत्याचारांना लगाम बसेल. जळगावात राष्ट्रवादीकडून पेढे वाटत या निर्णयाचे स्वागत झाले. जल्लोष करणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की दोन वर्षापूर्वीच घडलेल्या हैदराबादच्या डॉक्टर प्रियंका रेड्डी बलात्कार-हत्या प्रकरणात कायद्याच्या प्रक्रियेला बाजूला सारत चारही आरोपींना पोलिस एन्काऊंटरमध्ये मारले गेले आणि फक्त जनतेचा राग शांत नाही करवला गेला, तर त्याला ‘गोळ्या घाला’ सारख्या लोकशाही विरोधी विचारांमध्ये बदलवले गेले. पण तरीही महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये घट नाहीच! ना संख्येत ना गुन्ह्याच्या तीव्रतेत. एस.सी.आर.बी. या गुन्ह्यांची नोंद ठेवणाऱ्या राष्ट्रीय संस्थेच्या मते 2021 आणि 2020 मध्ये अशा घटनांमध्ये घट झाली आहे, परंतु ही दोन्ही वर्षे लॉकडाऊन मध्ये गेली आहेत हे विसरता कामा नये. त्या अगोदर 2019 पर्यंत सतत महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसून आली आहे.

यापुढे जाऊन बलात्कारासारख्या घटनांना मिळत असलेला राजाश्रय हेच दाखवतो की कायदे फक्त नावापुरते असतील. केंद्रात असलेल्या मोदी सरकारच्या काळात, महिला अत्याचाराचे गुन्हे असलेली आमदार-खासदारांची सर्वाधिक संख्या भाजपतच दिसून आली आहे. गेल्या 5 वर्षात मान्यताप्राप्त पक्षांनी अशा 41 उमेदवारांना तिकिटे दिली आहेत ज्यांनी स्वतःवर बलात्काराचे खटले चालू असल्याचे घोषित केले आहे. बलात्काराचे खटले चालू आहेत असे भाजपतील 66, कॉंग्रेस मध्ये 46, तर बसपा मध्ये40 असे मंत्री सध्या सत्तेवर आहेत. गेल्या 5 वर्षात खटले चालू असलेल्या एकूण 572 उमेदवारांनी निवडणुका लढवल्या आणि उमेदवार निवडून येऊन देखील एकालाही दोषी ठरवण्यात आले नाही. भाजपच्या कुलदीप सिंह सेंगर, चिन्मयानंद सारख्या बलात्काऱ्यांना वाचविण्याच्या समर्थनार्थ जाहीर फेऱ्या काढल्या गेल्या. नुकतेच कर्नाटकच्या कॉंग्रेस आमदार रमेश कुमार यांचे "बलात्काराला विरोध करता येत नसेल तर आडवे होऊन त्याचा आनंद घ्या " सारखे अतिशय घृणात्मक, स्त्रीविरोधी उद्गार तर कळस आहेत. जर राज्यकर्तेच अशा मानसिकतेचे असतील तर कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी कशी होईल हे आपण समजू शकतो.

## रोगाची पाळेमुळे भांडवली पितृसत्तेच्या व्यवस्थेत आहेत

स्त्री अत्याचारांना एकीकडे परंपरने जपलेली पितृसत्ताक व्यवस्था आहे जी एकीकडे स्त्रीचे दुय्यम स्थान जन्मापासून संस्कारांनी स्त्री-पुरुष सर्वांमध्ये भिनवते. दुसरीकडे तिचे कारण आहे भांडवली नफेखोर व्यवस्था जी आज सर्वच परंपरांगत सामंती मूल्यमान्यतांशी संघर्ष न करता त्यांपैकी अनेकांना आपल्या चौकटीत समावून पुढे जात आहे; ती स्त्रीदेहाचे बाजारीकरणही करते आणि स्त्रीला खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊही देत नाही. भांडवली व्यवस्था प्रत्येक गोष्टीचं मालात रूपांतर करत जाते. स्त्रीलाही एक उपभोग्य वस्तू, जाहिरातीची वस्तू, एक शरीर म्हणून या बाजारात आणते आणि तिच्याकडे क्रयवस्तू म्हणून बघण्याची बीभत्सता भांडवली मीडियातून पसरवली जाते. सर्वच प्रसारमाध्यमे आज बीभत्सतेचा वापर करून माल विकण्यात हिरीरीने पुढे आहेत. पोर्नोग्राफी आणि अश्लीलतेला तर सरकारी मान्यतेने चालवले जाते. याहीपुढे जाऊन हे समजणे आवश्यक आहे की भांडवली व्यवस्थेची संरचनाच लिंगभेद मिटवण्यास असमर्थ आहे. जगात स्त्रीचे दुय्यम स्थान निर्माणच झाले खाजगी संपत्तीच्या निर्मितीनंतर. आज स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे, स्त्री-पुरुष न्याय्य नाते स्थापित करणे, स्त्री मुक्ती तेव्हाच शक्य आहे, जेव्हा स्त्री आपल्या जीवनाचे निर्णय स्वतंत्रपणे स्वत: घेऊ शकेल. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा अशी आर्थिक-सामाजिक व्यवस्था लागू होईल जी सर्वांना विकासाची संधी देईल. रोजगारासारख्या मूलभूत अधिकारापासूनही वंचित ठेवणाऱ्या भांडवली व्यवस्थेत ते शक्यच नाही.

आज स्त्री अत्याचाराविरोधात योग्य तरतुदी असलेल्या कायद्यांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची मागणी करत असतानाच, त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे की भांडवली पितृसत्तेच्या विरोधात निर्णायक संघर्ष छेडला जावा. एकीकडे अत्याचारांविरोधात लढे उभे करत असताना एक अत्यंत व्यापक मूलगामी वैचारिक संघर्षही छेडणाऱ्या आणि घुसळण करणाऱ्या प्रखर प्रबोधनाची व्यापक मोहिम राबवली जावी, आणि नफ्याच्या व्यवस्थेविरोधात क्रांतिकारी आंदोलन उभे व्हावे. नफेखोर व्यवस्थेचा अंत केल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्रीदास्याचा अंत शक्य नाही. त्यामुळे कामगार वर्गीय विचारांची कास धरली जाणे या संघर्षाकरिता अपरिहार्य आहे.

# एस.टी. विलिनीकरणाचा लढा: भांडवली पक्षांचे कामगार विरोधी चरित्र झाले उघडे

बबन ठोके

मागील दोन महिन्यापासून सुरु असलेल्या एस.टी कामगारांच्या संपानिमित्त सर्वच भांडवली पक्षांचे चरित्र्य पुन्हा एकदा उघडे पडले आहे. या संपा दरम्यान भाजप, काँग्रेस, शिवसेना, मनसे, राष्ट्रवादी सारख्या पक्षांच्या नेत्यांनी केलेली वक्तव्ये किंवा "न घेतलेल्या" भुमिका सुद्धा स्पष्ट दाखवतात की निवडणुकीत मते मागताना गोड-गोड भाषा वापरणाऱ्या, अनेकप्रसंगी एकमेकांना शिव्याशाप देणाऱ्या या सापनाथ-नागनाथांचे दाखवायचे दात वेगळे आहेत, पण खाण्याचे विषारी दात मात्र एकच आहेत.

सर्वप्रथम आपण हे समजले पाहिजे की वर्गीय बाजू नसलेला, एका वर्गाच्या बाजूने आणि दुसऱ्या वर्गांच्या विरोधात नसलेला राजकीय पक्ष असूच शकत नाही आणि "आम्ही सर्वांचे" म्हणणारे हे वास्तवात ढोंगी असतात, आपली खरी कामगार विरोधी वर्गीय बाजू लपवण्यासाठीच ते "आम्ही सर्वांचे" असल्याचे ढोंग करत असतात. कोणताही पक्ष अस्तित्त्वाच असतो सत्तेकरिता आणि सत्तेला, कायदा बनवणाऱ्यांना, वर्गीय बाजू असतेच. याचे कारण आहे की कामगारवर्ग आणि कामगारांचे शोषण करणार, त्यांनी निर्माण केलेला नफा खिशात घालणारा भांडवलदार-मालक वर्ग यांचे हितसंबंध एक असूच शकत नाहीत आणि म्हणूनच कोणत्याही सत्ताधाऱ्याला या दोन्हींपैकी एकाच वर्गाची बाजू घेणे शक्य आहे.

आज महाराष्ट्रात असलेल्या प्रमुख पक्षांपैकी भाजप, काँग्रेस, हे प्रामुख्याने देशातील मोठ्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाच्या विविध गटांचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे, वंचित बहुजन आघाडी, सारखे पक्ष हे प्रामुख्याने प्रादेशिक स्तरावरील भांडवलदार वर्गाच्या विविध गटांचे प्रतिनिधित्व करत असतात. एकूणच भांडवलदार वर्गाच्या हितांचे प्रतिनिधित्व हे लहान-मोठ्या स्तरावरील पक्ष करत असतात आणि त्यांच्याच निधीवर पोसले जात असतात. म्हणून हे सर्वच पक्ष खाजगीकरणाचे, कंत्राटीकरणाचे खंदे समर्थक आणि कामगार वर्गाचे विरोधक असतात. विरोधी पक्षात असतांना हे पक्ष कामगारांचे समर्थक असल्याचे ढोंग करत असतात व आणि कामगार जेव्हा आपल्या न्याय मागणीला घेऊन संघर्ष करत असतांना मागे हटत नाहीत तेव्हा या पक्षांचे खरे रुप समोर येते. एस.टी कामगारांच्या या संपात देखील कामगारांनी हेच अनुभवले आहे. पुढे हे पक्ष इथेच थांबत नाहीत तर वेळ आल्यावर त्यांचा खरा चेहरा दाखवत कामगारांचे दमन करायला देखील अजिबात मागे पुढे पाहत नाहीत. हे इतिहासात अनेक वेळेला वेळोवेळी समोर आले आहे. हे पक्ष चालतातच खाजगी वाहतूक उद्योगाच्या मालकांच्या पैशांवर, बिल्डर-उद्योगपती-ठेकेदारांच्या पैशांवर; या पक्षांचे नेते स्वत: उद्योगपती आहेत; याही पुढे सांगायचे झाल्यास या पक्षांची विचारधारा खुलेपणाने खाजगीकरण, कंत्राटीकरणाची नफ्याच्या व्यवस्थेची, भांडवलशाहीची समर्थक आहे व भांडवलदारांच्या हितासाठी अनेक झेंड्याच्या आणि चेहऱ्याच्या माध्यमातून काम करत असते. अशा पक्षांकडून कामगारांनी आशा लावणे म्हणजे फक्त स्वत:ची फसवणूक आहे.

त्यामुळेच एस.टी.च्या खाजगीकरणात या सर्व पक्षांचा पुढाकार राहिला आहे. खाजगी शिवनेरी-शिवशाही गाड्या असोत, वा रोजंदारी कर्मचाऱ्यांची मोठी भरती, तिकीट मशिन असोत, वा इतर अनेक कामांचे कंत्राट काढून खाजगी मालकांना फायदा पोहचवणे असो, एक ना अनेकविध मार्गांनी सर्वच पक्षांनी खाजगीकरण रेटले आहे. त्यासोबतच या पक्षांनी फाटाफुटीचे राजकारण करून कामगारांची संघटित शक्ती कमी करवली आहे आणि कामगारांची राजकीय चेतना कुंठित केली आहे व हेतूपुरस्सर कामगारांना राजकीय शिक्षण प्रशिक्षणापासून वंचित ठेवले आहे.




एस.टी. कामगारांच्या दोन महिन्याच्या संघर्षात कामगारांच्या संपाला घेऊन भांडवली पक्षांच्या नेत्यांनी वेळोवेळी केलेली वक्तव्य आता आपण पाहूत. ही सर्व वक्तव्य या भांडवली पक्षांच्या वैचारिक बांधिलकीची व हितचिंतनाची प्रातिनिधिक नमुने आहेत.

**महाविकास आघाडीचे धोरणकर्ते शरद पवार** यांनी महाबळेश्वर येथे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात आपल्या भाषणात स्पष्ट केले कि "एस.टी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करण्याची कामगारांची मागणी आहे... 96 हजार कर्मचारी आहेत. एस.टीसह आरोग्य सेविका , अशा वर्कर,... आणि इतर महामंडळे आहेत. एस.टी च्या विलीनीकरणाचं सूत्र स्वीकारले तर ते सर्वांना लागू होईल ." शरद पवार यांच्या वरील वक्तव्यावरून हे स्पष्ट होते कि सरकारी तिजोरीतून जनतेची सेवा करणाऱ्यांना पगार दिले तर भांडवलदार-बिल्डर-ट्रान्स पोर्टर्सला काय देणार? हि रास्त भीती भांडवलदारांच्या सत्ताधारी वर्गाला आहे.

**उपमुख्यमंत्री अजित पवारांनी** सुरुवातीला कामगारांना सल्ला देत सांगितले होते कि "कामगारांनो जास्त ताणून धरू नका! सरकार दोन पावलं पुढे यायला तयार आहे. तुम्ही पण दोन पावलं टाका आणि तोडगा काढा!" पण तोडगा म्हणून सरकारकडे काय होते तर फक्त अंतरिम पगारवाढ म्हणजे "फसवी पगारवाढ!" पुढे चालून अजित पवार म्हणाले कि, "सरकारच्या सहनशिलतेचा अंत पाहू नका!" विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात बोलत असतांना उपमुख्यमंत्री अजित पवार कामगारांना पुन्हा सूचक सल्ला देतांना सांगतात कि, "तुमचा गिरणी कामगार होऊ देऊ नका! कोणतेही सरकार असले तरी विलीनीकरण शक्य नाही, विलीनीकरण कधी तरी होईल हा विषयच डोक्यातून काढून टाका!"

**याच वेळेस** शिवसेनेचे **परिवहन मंत्री अनिल परब** कामगारांना एकानंतर एक अल्टीमेटम देऊन धमकावण्याचे काम करत होते व गरज पडल्यास मेस्मा सारख्या गैर लोकशाही कायदा लावून तुरुगात टांगू याची देखील तयार झाली आहे असे वक्तव्य करत होते. तर शिवसेना खासदार संजय राऊत "कामगारांना गिरणी कामगार होईल!" अशा सूचक धमक्या देत होते.

"सत्तेपासून वंचित" असलेला पक्ष **वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर कामगारांना** "संप ताणू नका, कुठे तरी थांबले पाहिजे. तुमचा गिरणी कामगार होऊ देऊ नका!" असे वक्तव्य करून सत्ताधाऱ्यांच्या सुरात सूर मिळवत होते. याच काळात परिवहन मंत्री यांनी दहा हजार पेक्षा जास्त कामगारांना नोटीसा बजावून निलंबन, सेवा समाप्ती, बडतर्फी व बदल्या केल्या. ह्या तुघलकी निर्णयामुळे अनेक कामगार हृदयविकाराच्या झटक्याने मरणाला कवटाळत मुत्युच्या दारात फेकले गेले.

सरकारच्या मंत्री नेत्याकडून येणाऱ्या धमक्यांना कामगार तोंड देत होते; पण जे कामगार मुत्युच्या दारात फेकले गेले त्याबद्दल सरकारला व विरोधी पक्षाला तसूभर सुद्धा फरक पडलेला दिसत नाही. ह्या दरम्यान कामगारांच्या मृत्यूचा आकडा 59 झाला. हे सर्व मृत्यू खरेतर स्वाभाविक मृत्यू नसून सरकार कडून करण्यात आलेल्या संस्थात्मक हत्या आहेत व ह्याला जबाबदार पूर्णपणे सरकार आहे.

**अजित पवारांचे** वक्तव्य काय सांगते? एकीकडे सरकार सांगते कि विलीनीकरण हा मुद्दा न्यायालयात प्रलंबित आहे. त्यासाठी त्रिसदस्यीय नेमली आहे, समितीचा जो अहवाल असेल तो सरकारला मान्य असेल. पण दुसरीकडे ते सांगतात की विलिनीकरण शक्य नाही. याचा अन्वयार्थ आहे की समितीचा अहवाल हा कामगारांच्या बाजूने येणार नाही.

भाजपच्या भुमिकेबद्दल कामगारांच्या एका हिश्श्यामध्ये अजूनही भ्रम आहेत. **पडळकर आणि खोतांनी धोका देऊन कधीच पळ काढला आहे, परंतु त्यापलीकडे हे विसरता कामा नये की भाजपचे सरकार होते तेव्हा त्यांनी देखील विलीनीकरणाची भूमिका घेतली** नव्हती.

या सर्व भांडवली पक्षांच्या विलिनीकरणाला विरोध असण्याचे कारण सोपे आहे. ते म्हणजे हे सर्व पक्ष मिळून भांडवलदार वर्गाच्या विविध गटांच्या समाईक हिताचे प्रतिनिधित्व करतात. जर एस.टी. संपासमोर झुकून खाजगी वाहतूक क्षेत्रातील भांडवलदारांच्या विरोधात निर्णय घेतला, तर उद्या अशाच मागण्या इतर क्षेत्रातही उठणे चालू होईल आणि व्यापकरित्या भांडवलदारांचे हित धोक्यात येईल. भांडवलदारांच्याच (कॉर्पोरेट कंपन्या, ठेकेदार, बिल्डर, वाहतूक व्यावसायिक, व्यापारी, धनिक शेतकरी, इ.) निधीवर पोसलेल्या या पक्षांना त्यामुळेच विलिनीकरण नको आहे.

**कामगारांच्या एका मोठ्या संख्येला न्यायालयाबाबतही भ्रम आहेत.** हे समजणे आवश्यक आहे की विलीनीकरण हा मुद्दा न्यायालयाच्या कार्यक्षेत्राचा नसून कार्यकारी मंडळाचा, म्हणजेच सरकारच्या कार्यक्षेत्राचा आहे. विलीनीकरण हा मुद्दा सरळ खाजगीकरण आणि कंत्राटीकरणाला जाऊन भिडतो आणि प्रस्थापित आर्थिक-राजकीय धोरणांच्या विरोधात जातो. न्यायालयाचा आजतागायतचा अनुभव असा आहे की न्यायालय राज्याच्या धोरणात्मक बाबीत हस्तक्षेप करत नाहीत. न्यायालय फक्त खाजगीकरणाला पूरक असलेल्या व सरकारने बनवलेल्या कायद्यांच्या प्रक्रियागत नियमांच्या उल्लंघनाबद्दल कायदेशीर पद्धतीने व्याख्या करणे एवढेच काम करत असते. सरकारी धोरणांच्या चौकटीवर न्यायालयाकडून प्रश्न उपस्थित केला जाऊ शकत नाही.

अशात एस.टी संप एका कठीण वळणावर येऊन उभा राहिला आहे. कामगारांनी विलिनीकरणाच्या मार्गातील अडथळे आणि आव्हाने ओळखून आपली संघटित शक्ती सामुहिक नेतृत्वात उभी करत व्यक्तिकेंद्रित नेतृत्वाला बाजूला सारले पाहिजे व व्यापक जनसमुहाला आपल्या आपल्या बरोबर घेऊन आपल्या लढ्याला खाजगीकरण, कंत्राटीकरण विरोधी संघर्षात बदलत, खात्रीशीर रोजगाराच्या लढाईचा अविभाज्य भाग बनवत, सरकारी सेवा सुविधा सशक्तीकरणासाठीच्या संघर्षाचे रूप देणे आवश्यक आहे. ज्या आंदोलनात योग्य राजकीय कार्यदिशेचा अभाव असतो व व्यापक जनतेचा पाठींबा मिळालेला नसतो अशा आंदोलनाला सरकार दडपून टाकू शकते; पण कामगारांची संघटित शक्ती, योग्य कामगारवर्गीय राजकीय कार्यदिशा, आणि व्यापक जनतेचे समर्थन असलेले आंदोलन कितीही मोठ्या शक्तीला शरणागती पत्करायला भाग पाडू शकते.

हे विसरता कामा नये की राजकारण नव्हे तर भांडवली राजकारण आपले शत्रू आहे आणि कामगार वर्गीय राजकारणच आपल्याला योग्य दिशा देऊ शकते. भांडवली पक्षांच्या दावणीला बांधलेल्या संघटनांनी दिलेल्या धोक्यामुळे कामगारांचा एक हिस्सा संघटना संकल्पनेलाच नाकारू लागला आहे. यापेक्षा मोठा आत्मघात दुसरा असू शकत नाही. हे विसरता कामा नये की संघटना नाही तर भांडवली पक्षांच्या दावणीला बांधलेल्या संघटना आपल्या शत्रू आहेत आणि कामगार वर्गीय विचारांची संघटना ही आपल्या अस्तित्त्वाची गरज आहे!

# न्यायालय नाही, तर फक्त वर्ग-संघर्षच खरा न्याय देऊ शकतो!

पान 1 वरून

आहे! संपाच्या दरम्यान औद्योगिक कोर्टाने नुकतीच 9 जणांवरील बडतर्फीची कारवाई कायम केली आहे यावरून तरी योग्य निष्कर्ष काढला पाहिजे.

भांडवली व्यवस्थेमध्ये राज्यसत्तेच्या सर्वच अंगांचे काम असते भांडवली चौकटीचे रक्षण करणे. सरकारमधले पक्ष जरी बदलत असले तरी चालविते धनी मात्र भांडवलदारच असतात, कारण विविध भांडवली पक्षांना भांडवलदार वर्गच पोसत असतो. त्यामुळे सर्व नियम-कायदे, निर्णय-धोरणे अंतिमत: भांडवलदार वर्गाचे हित केंद्रस्थानी ठेवूनच बनवले जातात. त्यामुळेच ह्या नियम कायद्यानुसार "न्याय-निवाडा" करणारे न्यायालयेसुद्धा अंतिमत: भांडवलदार वर्गाच्या व्यापक व दीर्घकालीन हिताच्या बाजूनेच न्याय करत असतात.

देशाच्या नजिकच्या इतिहासातही न्यायालयांनी कामगार-कष्टकरी वर्गाच्या हितविरोधात आणि भांडवलदार वर्गाच्या हितामध्ये निर्णय देण्याची अनेक उदाहरणे आहेत. भोपाळ वायुकांडाचेच घ्या. **1984 साली युनियन कार्बाइड कंपनीमध्ये वायूगळती** होऊन हजारो माणसं एका रात्रीत मेली आणि लाखो त्यानंतर हळूहळू अनेक वर्षे मरत राहिली. दुर्घटना घडल्यावर लगेचच सरकारने कंपनी मालकाला विदेशात पळून जाण्याची सोय करून दिली, व नंतर न्यायालयानेही नुकसानभरपाई मागणाऱ्या जनतेला निराशाच दिली आहे. आजही या घटनेबद्दल एकालाही तुरुंगात टाकले गेले नाही! **2005 मध्ये होंडाच्या गुरगाव येथील कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांनी संप केला.** संप चिघळल्यावर पोलिसांनी बेछूट लाठीमार केला. त्यात 700 कामगार जखमी झाले. आठ वर्ष उलटून गेल्यानंतर ह्या प्रकरणात गोवल्या गेलेल्या 62 कामगारांची न्यायालयाने 2013 मध्ये निर्दोष मुक्तता केली, परंतु कामगारांना अशी अमानुष मारहाण करणाऱ्या पोलिसांवर, पोलिसांना कारवाई करण्याची विनंती करणाऱ्या मालकावर कोणतीही कारवाई केली नाही! **2012 मध्ये मारुतीच्या मानेसार येथील कारखान्यात कामगारांनी संप केला.** अतिशय कमी पगारात कामगारांची पिळवणूक ह्या कारखान्यात केली जात असे. ह्याविरोधात कामगारांनी संप केल्यावर मालकाने कारखान्यात 1500 पोलीस व सुरक्षारक्षक उभे केले! पगारवाढीची बोलणी फिस्कटल्यावर ह्या दंडुकेबहाद्दरांनी कामगारांची मारहाण सुरु केली. कामगारांनी प्रतिकार केला. दुसऱ्या दिवशी पोलिसांनी हिंसा व जाळपोळ करण्याचा गुन्हा लावून 150 कामगारांना तुरुंगात डांबले! जिल्हा न्यायालयाने आणि नंतर हरियाणा उच्च न्यायालयाने देखील ह्या कामगारांचा जामीनसुद्धा नाकारला! अनेक वर्षे ह्या कामगारांनी तुरुंगात काढली. त्यांच्या आयुष्याची, घरादाराची अक्षरश: राखरांगोळी झाली. 2017 मध्ये ह्यातील 117 कामगारांना कोर्टाने निर्दोष सोडले. परंतु त्यांच्या घामाच्या, रक्ताच्या प्रत्येक थेंबातुन नफा पिळून घेणाऱ्या मालकाला मात्र काहीही केले नाही! **फार लांब नको, सध्याच्या लॉकडाऊनचेच उदाहरण घ्या.** लॉकडाऊनमध्ये हजारो किलोमीटर चालत निघालेल्या कामगारांना सरकारने आर्थिक मदत करावी अशी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आल्यावर **'त्यांना सरकार जेवू घालत आहे तेव्हा त्यांना पैशाची गरजच काय'** असा निर्लज्ज सवाल भारताच्या सरन्यायाधीशांनी केला होता! दुसरीकडे ह्याच कामगारांकडून अव्वाच्या सव्वा वीजबिल उकळणाऱ्या, पीएम केअर्स फंडातले कोट्यवधी रुपये गायब करणाऱ्या सरकारला मात्र एक शब्दही सुनावलेला नाही! नुकतेच मोदी सरकारने कामगार कायद्यांमध्ये बदल केलेला आहे. आता भांडवलदारांना कामगारांची 8 ऐवजी 12 तास पिळवणूक करून घेणे शक्य आहे. मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरणाला ह्या नव्या कामगार कायद्यांमधून चालना मिळणार आहे. भांडवलदारांना कामगारांची लूट करायला रान मोकळे करून देणारे हे कायदे आहेत. अशा सर्व कायद्यांना देशातील न्यायालये मान्यता देत आली आहेत!

न्यायालयांची कामगारांप्रती काय भुमिका आहे हे खाली दिलेल्या काही केसेसच्या उदाहरणांवरूनही समजून घेता येईल. **(1) रुस्तम कवासजी कूपर विरुद्ध भारतीय संघ, (1970)** मध्ये सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे कि "वेगवेगळ्या राजकीय सिद्धांतांचे वा आर्थिक धोरणांचे तुलनात्मक गुणदोष विचारात घेणे हे न्यायालयाचे काम नव्हे. ह्या न्यायालयाकडे अधिकारक्षेत्राचे उल्लंघन केल्याच्या कारणाने एखादा कायदा रद्द करण्याचा अधिकार आहे, परंतु एखादा कायदा करण्यामागच्या संसदेच्या धोरणाबद्दल न्यायालयात सुनावणी होणार नाही..." **(2) आर के गर्ग विरुद्ध भारतीय संघ व इतर (1981)** "... जे कायद्यांबद्दल तेच संसदेने स्वीकारलेल्या धोरणांबद्दल देखील लागू आहे. त्यांची परीक्षा न्यायालयात केली जाऊ शकत नाही. ... खाजगीकरण ही आर्थिक निर्णय घेण्याच्या अधिकाराच्या मुळाशी असणारी मूलभूत संकल्पना आहे. देशाच्या आर्थिक विकासप्रक्रियेत राज्यसत्तेची भूमिका काय असायला हवी? देशाची संसाधने कशापद्धतीने वापरली जावीत? निश्चित केलेली उद्दिष्टे कशी प्राप्त करावीत? ... ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे एका दक्ष संसदेने दिली पाहिजेत. हे सर्व प्रश्न देशाच्या धोरणकर्त्यांचे असल्यामुळे न्यायालयाला ह्याबाबत मर्यादा पडतात. ह्याबाबत कोणतेही निर्देश दिले जाऊ शकत नाहीत व न्यायालयाकडून तशी अपेक्षादेखील केली जाऊ शकत नाही, जोपर्यंत ही धोरणे लागू करताना कोणत्याही घटनात्मक वा वैधानिक तरतुदीचे उल्लंघन वा अतिक्रमण होत नाही..." **(3) सदर्न स्ट्रक्चरल्स स्टाफ युनियन वि. सदर्न स्ट्रक्चरल्स व्यवस्थापन आणि आणखी एक (1994) ह्यात कोर्टाने नोंदवले आहे की...** "...जेव्हा सरकार एखादा उद्योग एक कंपनी बनवून चालवते व ती त्यातील एक भागधारक बनते, तेव्हा कंपनी कायद्याच्या तरतुदींनुसार एक भागधारक म्हणून आपल्या मालकीचे भाग हस्तांतरित करण्याचा हक्क सरकारला आहे." थोडक्यात महामंडळ सरकार विकूही शकते! **(4) बाल्को (BALCO) कर्मचारी युनियन (नोंदणीकृत) विरुद्ध भारतीय संघ व इतर (2001), यात न्यायालयाने म्हटले की** "...मालक कंपनी ही सरकारी कंपनी किंवा "इतर शक्ती"च्या स्वरूपात चालत राहण्यामध्ये कामगारांना कोणताही निहित अधिकार नाही" ..."निर्गुंतवणुकीकरणाचा निर्णय आणि त्याची अंमलबजावणी हा एक पूर्णत: सरकारच्या आर्थिक धोरणाशी संबंधित प्रशासकीय निर्णयाचा भाग आहे." ..."कामगारांना केवळ स्वत:चे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा हक्क आहे, **[पण] त्यांना भारत सरकारच्या निर्गुंतवणूक करण्याच्या अधिकाराला आव्हान देण्याचा कोणताही हक्क नाही.**" **(5) कर्नाटक उच्च न्यायालयाने प्रा. बाबू मॅथ्यू आणि इतर विरुद्ध भारतीय संघराज्य [1997] या खटल्यासंदर्भात केलेली नोंद अशी आहे.** "...सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतील कामगारांशी सल्लामसलत करणे हा [धोरणांच्या] सार्वजनिक हिताचा एक पैलू आहे असे प्रमाण देण्यात आलेले नाही."

थोडक्यात कामगारांना खाजगीकरणासंदर्भात अधिकार नाही, कामगारांशी धोरणात्मक सल्लामसलत करणे सरकारला बंधनकारक नाही, खाजगीकरण वा सरकारीकरण हा पूर्णपणे सरकारी धोरणांचा मामला आहे, सरकार मालकी विकू शकते, अशीच मते न्यायालयांनी वेळोवेळी व्यक्त केली आहेत. असे असताना न्यायालय एस.टी. कामगारांचे विलिनीकरण करेल अशी आशा कशी काय लावली जाऊ शकते?

## दुसरीकडे सरकारकडून एस.टी.च्या खाजगीकरणाची तयारी चालू

कामगारांना प्रचंड हालापेष्टा सहन करून, मुलाबाळांची आबाळ करून, संपावर बसलेले असताना राज्य सरकार मात्र खाजगीकरणाला पुढे रेटत आहे. नोव्हेंबर महिन्यातील परिवहन महामंडळाच्या एका बैठकीत महाराष्ट्रात 'उत्तर प्रदेश पॅटर्न' राबवण्याच्या निर्णयाबद्दल चर्चा झाली होती. उत्तर प्रदेशात नवीन गाड्यांची खरेदी न करता सर्व नवीन बसेस खाजगी ट्रान्सपोर्टर कडून भाड्याने घेतल्या जात आहेत. भाजपचे खाजगीकरणाबद्दलचे धोरण ह्या उत्तर प्रदेश पॅटर्नमधून एकदम स्पष्ट होते. ह्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे उत्तर प्रदेश मध्ये महामंडळातील कामगार संख्या फक्त 52,000 उरली आहे. यापैकी फक्त 18,000 कायमस्वरूपी तर 34,000 कंत्राटीपद्धतीने किंवा मजुरीवर काम करणारे कामगार आहेत ज्यांच्या बहुसंख्येला फक्त रु. 10,000 च्या जवळपास एवढा तुटपुंजा पगार आहे. महाराष्ट्रात एका बाजूने कोर्ट निर्देशानुसार त्रिसदस्यीय समितीचा अभ्यास सुरू आहे आणि दुसऱ्या बाजूने ह्याच सरकारने संप सुरू झाल्यावर एसटी महामंडळासाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप म्हणजेच खाजगीकरणासंबंधात अभ्यास करण्यासाठी केपीएमजी नावाच्या एका खाजगी कंपनीला काम दिलेले आहे.

कामगारांनी पुन्हा एकदा आपले शत्रू आणि मित्र कोण हे नीट ओळखले पाहिजे! सर्व भांडवली पक्ष हे देशातील छोट्या किंवा मोठ्या भांडवलदार वर्गाच्या गटाच्या हितांचे प्रतिनिधित्व करतात, त्यांच्या निधीवर पोसले जातात. त्यामुळे सरकारांना संचालित करणारी खरी शक्ती ही भांडवलाची शक्ती असते. म्हणूनच आलटून पालटून सत्तेत आलेल्या सर्व पक्षांच्या सरकारमार्फत खाजगी भांडवलदार, कारखानदार, मोठमोठे-व्यापारी, धनिक शेतकरी, खाजगी वाहतूक करणारे भांडवलदार, ट्रान्सपोर्टर, ठेकेदार ह्यांच्या हिताकरिता खाजगीकरण, कंत्राटीकरणाचे धोरण राबवले जाते. म्हणजेच कामगार वर्गाचा खरा संघर्ष हा पडद्याआडून खरी सत्ता ज्या भांडवदार वर्गाच्या हातात आहे त्यासोबत व त्यांच्याकडून नियंत्रित राज्यसत्तेसोबत आहे.

दोन महिन्यांच्या आंदोलनात भांडवली व्यवस्थेच्या अनेक पैलूंचे खरे चारित्र्य आपल्यासमोर उघड झाले आहे. ह्या ना त्या निवडणूकबाज पक्षांनी पोसलेल्या युनियन, आणि बंद दारामागे तडजोडी करून थोड्याफार सवलती आणि फायदे पदरात पाडून घेतल्यासारखे करून कामगारांना फसवणारे, व त्यावर आपली पोळी भाजून घेणारे दलाल युनियनचे नेते आज आपल्यासमोर उघडे पडले आहेत. निवडणुकीच्या अगोदर गोड गोड बोलणारे, विलिनीकरणाची आश्वासने देणारे सर्वच राजकीय पक्ष आणि मेस्माचा धाक दाखवणारे, तुटेपर्यंत ताणू नका अशी धमकी देणारे त्यांचे मंत्री, आपल्या संपाला पायदळी तुडवणारी प्रसारमाध्यमं, सगळी आज आपल्यासमोर नागडी झाली आहेत.

वास्तवात देशातील संपूर्ण राज्यसत्ताच खाजगी भांडवलाच्या व नफ्याच्या रक्षणासाठी व वाढीसाठी काम करते. खरेतर स्वातंत्र्यापासूनच, आणि विशेषत: मागच्या तीस वर्षांपासून उघडपणे सरकार खाजगीकरणाचेच धोरण अवलंबते आहे. गेल्या काही वर्षात एस टी महामंडळाच्या कारभाराचे देखील मोठ्या प्रमाणात खाजगीकरण झाले

पान 7 वर

# न्यायालय नाही, तर फक्त वर्ग-संघर्षच खरा न्याय देऊ शकतो!

पान 6 वरून

आहेच. आपली विलीनीकरणाची मागणी ही खाजगीकरणाच्या धोरणाच्या विरोधात शड्डू ठोकून उभी आहे. ह्या व्यवस्थेचे प्रत्येक अंग, मग ते राजकीय पक्ष असोत, किंवा त्या पक्षांची सरकारे असोत, किंवा प्रसारमाध्यमे असोत, धनाढ्य भांडवलदारांच्या पैशावरच उभी राहतात, आणि त्यांच्यासाठीच काम करतात.

### एस.टी. कामगारांच्या लढ्यातील गंभीर धोरणात्मक चुका

कोणताही लढा हा शक्तीचा लढा असतो. एकीकडे लाखभर कामगार एकजुटीने लढत आहेत, पण त्यांच्याविरोधात उभी आहे ती सरकारची संपूर्ण यंत्रणा, भांडवली पक्षांचे प्रचाराचे जाळे, भांडवलदाद्वारेच चालवला जाणारा नफेखोर मीडीया, पोलिस आणि राज्यसत्तेची सर्व अंग. असे असताना एकीकडे एस.टी. कामगारांनी आपल्या प्रदीर्घ लढ्याने, निलंबने आणि बडतर्फ्या होऊनही माघार न घेता, राज्य सरकारला आपल्या एकीची जाणीव नक्कीच करून दिली आहे आणि मेस्मा लावण्याच्या विचारापासून बराच काळ सरकारलाही रोखले आहे. परंतु कोणतीही लढाई तेच जिंकू शकतात जे लढ्याला सतत वाढत्या उंचीला नेत शत्रूला नामोहरम करू शकतात. एस.टी. कामगारांचा लढा एकाप्रकारे कुंठीत होऊन थबकल्याच्या स्थितीकडे जाताना दिसत आहे. याची कारणे या लढ्याच्या सांघटनिक आणि विचारधारात्मक कमजोरीमध्ये आहेत.

**सर्वप्रथम** या लढ्याला संप न म्हणता 'दुखवटा' म्हणून न्यायालयाकडून मान्यता मिळवल्याची भावना वरचढ आहे, परंतु असे करताना संप नावाचे सर्वाधिक प्रभावी हत्यार कामगारांनी स्वत:हूनच सोडले आहे. जगाच्या इतिहासामध्ये कामगारांच्या संपांनीच मालकवर्गाला त्यांच्या शक्तीची खरी जाणीव करून दिली आहे आणि सत्तेला हादरवले आहे, परंतु या लढ्यामध्ये मात्र संपाचे हत्यार सोडून कामगारांनी संघर्षाला धार चढवण्यात स्वत:चे हात बांधून घेतले आहेत. संप करण्याच्या अधिकाराला कामगारांनी नेहमीच लढून मिळवले आहे आणि लढूनच टिकवले जाऊ शकते. जे सरकार 2 महिने आपल्याकडे दुर्लक्ष करू शकते, ते अजून 1 महिनाही दुर्लक्ष करू शकते, तेव्हा दुखवट्याचा कालावधी संपल्यावर तरी संपाचे हत्यार म्यान करता कामा नये. **दुसरी** कमजोरी म्हणजे संघटना शक्तीचा अभाव. सर्व प्रस्थापित दलाल युनियन्सना नाकारून कामगारांनी स्वत:स्फूर्त लढा तर उभा केला आहे परंतु सुसंघटित, एकविचारी नेतृत्व नसल्यामुळे आंदोलन कसे पुढे न्यावे याबद्दल कामगारांकडे त्यांच्यामधून आलेली कोणतीही दिशा उरलेली नाही; इतकेच नाही तर यापेक्षाही धोकादायक म्हणजे संघटनाच नको याप्रकारचा विचार रूढ होत आहे. हे कधीही विसरता कामा नये की संघटना भ्रष्ट होतात, भरकटतात याचे प्रमुख कारण हे आहे की त्या योग्य कामगारवर्गीय विचाराच्या आधारावर उभ्या नसतात, लोकशाही पद्धतीने काम करत नाहीत. परंतु अपयश मिळो वा निराशा, योग्य संघटना उभी करण्याच्या संघर्षाचे आव्हान कामगार वर्गाला पेलावेच लागते; नाहीतर आपल्या एकीचे सर्वात प्रभावी हत्यारच आपण गमावून बसतो. संघटनाशक्तीवरचा विश्वास गमावणे म्हणजे स्वत:वरचाच विश्वास आणि शक्ती गमावणे, कारण सुसंघटित नसलेल्या कामगारांची कोणतीही शक्ती नसते! **तिसरी** गोष्ट म्हणजे या लढ्याला पूर्णपणे न्यायालयीन लढाईचे रूप देणे आणि असे करताना स्वत:चेच हात बांधून घेणे. आपल्या मागणीचे राजकीय-आर्थिक परिणाम पूर्णपणे न उमगता, स्वत:च्या राजकीय जबाबदारीची जाणीव करून न घेता, स्वत:च्या भवितव्याला कामगारवर्गाच्या संघटीत शक्तीच्या भरवशावर नाही तर वकिली कौशल्याच्या आणि न्यायालयीन दयेच्या भरवशावर सोडणे आणि स्वत:ला अस्तित्वहीन करण्याकडे नेणे हाच एक अप्रत्यक्ष पराजय आहे! आंदोलन सतत व्यापक करत जाणे, त्यामागे सतत वाढता जनाधार उभा करणे, यामार्गानेच राज्यसत्तेला दखल घेण्यास भाग पाडले जाऊ शकते!

आज एस.टी. कामगारांनी योग्य क्रांतिकारी कामगारवर्गीय विचारांच्या आधारावर, लोकशाही मार्गाने, आपली संघटना उभी करण्याचे काम तातडीने हाती घेतले पाहिजे. त्याकरिता कामगारांनी आपल्यातील सर्वाधिक प्रामाणिक, लढाऊ व्यक्तींची समिती निवडून देऊन त्यांमार्फतच बोलणी करण्याचा सरकारकडे आग्रह धरला पाहिजे. अनुभवाची वा समजदारीची कमतरता ही सामुहिकरित्या चालणाऱ्या नेतृत्वाकडूनच भरून येते. अशा समितीने तातडीने राजकीय-आर्थिक धोरणात्मक मुद्यांवर आणि योग्य लोकशाही कार्यपद्धतीसंदर्भात सर्व कामगारांच्या नियमित शिक्षण-प्रशिक्षणाचे कार्य पुढे नेले पाहिजे. आंदोलनाबाबतचे सर्व निर्णय अशा समितीने कामगारांशी नियमित सल्ला मसलत करून, पारदर्शक पद्धतीने घेतले पाहिजेत! या सर्वांचा रेटा कामगारांच्या प्रत्येक खालच्या फळीने लावून धरला पाहिजे. एकजुटीने उभे राहिलेले आंदोलन हीच याकरिता सर्वाधिक योग्य वेळ आहे! जे वेळ गमावतात, त्यांना इतिहास माफ करत नाही! आपण आस लावून बसलेलो असलो, तरी शत्रू मात्र आस लावून बसलेला नसतो! सरकार, इतर भांडवली पक्ष, न्यायालये यांच्याबद्दलचे सर्व भ्रम बाजूला सारून आपल्या शक्तीला योग्यरित्या सुसंघटित करण्याची हीच वेळ आहे!

# पंजाबमध्ये केजरीवाल आणि चन्नीमध्ये 'आम आदमी' बनण्याकरिता चालू आहे हास्यास्पद स्पर्धा!

पान 1 वरून

यापेक्षा अधिक हास्यास्पद अजून काय असू शकते की आपल्या पूर्ण कार्यकाळात झालेल्या आंदोलनांमध्ये आंदोलकांवर आणि न्याय्य मागण्या करणाऱ्या जनतेवर लाठ्या चालवणारे हे 'आम आदमी' निवडणुका जवळ येताच एकमेकांविरोधात चालणाऱ्या आंदोलनांमध्ये सहभाग करण्याची नौटंकी चालू करतात. काँग्रेस सरकार विरोधात मोहाली मध्ये 165 दिवसांपासून चाललेल्या कंत्राटी शिक्षकांच्या आंदोलनामध्ये 27 डिसेंबर रोजी केजरीवाल सामील झाला आणि 'आप' चे सरकार बनल्यास त्यांना पक्की नोकरी देण्याचे आश्वासन दिले. त्याचवेळी पंजाब काँग्रेसचे अध्यक्ष नवजोत सिंह सिद्धू 5 डिसेंबर रोजी दिल्लीमध्ये केजरीवालाच्या घराबाहेर चालू असलेल्या गेस्ट टीचर्स (पाहुणे, म्हणजे तात्पुरते शिक्षक) च्या आंदोलनात जाऊन बसले. अखिल भारतीय गेस्ट शिक्षक असंघाच्या मते दिल्ली मध्ये 22,000 पेक्षा जास्त शिक्षक 'गेस्ट' शिक्षक म्हणून काम करत आहेत आणि यांच्यापैकी बहुतेक सर्व गेल्या सात वर्षांपासून एखाद्या नियमित शिक्षकाएवढे काम करत आहेत. कोणीही व्यक्ती हे सांगू शकतो की आंदोलनांमध्ये सहभागी होण्याचे हे ढोंग फक्त राजकीय फायद्याकरिता केले जात आहे कारण खरोखरच यांना जनतेच्या मुद्यांशी काहीही देणेघेणे असते तर ही स्थिती आज आलीच नसती.

पंजाबमध्ये अकुशल, अर्ध-कुशल, कुशल आणि सर्वाधिक कुशल श्रेणीच्या कामगारांकरिता किमान वेतन क्रमश: 9,192 रु., 9,972 रु., 10,869 रु. आणि 11,901 रु. प्रति महिना आहे. शेतमजुरांना तर मजूर मानलेच जात नाही आणि किमान वेतनही मिळत नाही. एखादा कामगार आपला आणि आपल्या कुटुंबाचा निर्वाह इतक्या कमी मजुरीत करूच शकत नाही पण असंघटीत क्षेत्रातील कामगारांना हे किमान वेतन मिळणे सुद्धा दुरापास्त आहे!

गरिब शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे सहाय्य करण्यात काँग्रेस सरकार पूर्णत: अपयशी ठरले आहे. राष्ट्रीय गुन्हे रेकोर्ड ब्युरो (एन.सी.आर.बी.) च्या 2019 च्या अहवालानुसार पंजाबमध्ये दररोज सात शेतकरी आत्महत्या करतात. सन 2020 मध्येच आत्महत्येच्या 2,357 केसेसची नोंद झाली होती. धनिक शेतकरी आणि कुलक आणि आडते (जे अनेकदा धनिक शेतकरीच असतात) गरिब शेतकऱ्यांना चढ्या दराने कर्ज देतात आणि आत्महत्या करणाऱ्या गरिब आणि सीमांत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमुख कारण हाच कर्जाचा बोजा बनतो. सरकार हा दावा करत आहे की त्यांच्याद्वारे साडे पाच लाख शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले गेले आहे तर या मृत्यूमागे काय कारण आहे? करोना काळातही हेच धनिक शेतकरी पंचायत बोलावून शेतमजुरांच्या मजुरीवर वरची मर्यादा ठरवत होते आणि एखाद्या दुसऱ्या गावात जाऊन काम केल्यास शेतमजुरांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याबद्दल बोलत होते. भारतातील विविध राज्यांमधून पंजाबात येणाऱ्या कामगारांच्या शोषण आणि छळवणुकीत हे कुलक-धनिक शेतकरी कोणतीच कसर सोडत नाहीत. अशावेळी सरकार दुसरीकडेच मान फिरवून बसलेले असते आणि या शोषकांवर कारवाई करण्यापासून पळत असते. गरिब शेतकऱ्यांसाठी सरकारकडे संस्थाबद्ध कर्ज देण्यासाठी आणि शेती मध्ये लागणाऱ्या साधनांना उपलब्ध करवून देण्यासाठी काहीच सोय नाही; याकरिता लागणारा निधी उभा करण्यासाठी धनिक शेतकरी आणि भांडवलदार वर्गावर विशेशःअ कर लावण्याचीही सोय नाही कारण हे पक्ष कुलक-धनिक शेतकरी आणि मोठ्या भांडवलदारांचेच प्रतिनिधित्व करतात.

राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो नुसार 2017 मध्ये पंजाबात दलित अत्याचारांच्या प्रकरणांची संख्या 118 होती. 2018 मध्ये 168 खटले, 2019 मध्ये 166 खटले आणि 2020 मध्ये 165 खटले समोर आले. हे ते खटले आहेत ज्यांमध्ये पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद केली गेली. असे बहुसंख्य खटले तर समोर येतच नाहीत आणि वास्तव संख्या तर कैक पटींनी जास्त आहे. अशा हत्या आणि छळवणुकीच्या बहुसंख्या मामल्यांमध्ये उच्चजातीय लोक, जाट-शीखच दोषी आढळतात. बेअदबीच्या नावाने जमावाद्वारे केल्या जाणाऱ्या खुनांकडेही सरकार डोळेझाकच करते आणि अशा मामल्यांमध्ये दोषींना शिक्षा होतच नाही. अशा अनेक मामल्यांमध्ये सरकार फक्त गप्पच बसत नाही तर अनेकदा गुन्हेगारांना वाचवण्याचा पूर्ण प्रयत्नही करते. यापेक्षा अजून लाजीरवाणे काय असेल की निवडणुकांच्या ठीक अगोदर काँग्रेसने एका दलित नेत्याला मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर बसवून जनतेला फसवण्याचा प्रयत्न चालवला आहे. पंजाबात असलेल्या 32 टक्के दलितांना भुलवण्याखेरीज यामागे काय उद्दिष्ट असू शकते? नोव्हेंबर मध्ये मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देऊन आणि काँग्रेस सोडून नवीन पक्ष बनवणारे अमरेंद्र सिंह आता भाजप सोबत युती करते झाले आहेत. यातून हे तर एकदम स्पष्ट होते की भांडवली लोकशाही मध्ये नेते-मंत्री व्यक्तीगत स्वार्थाकरिता कोणत्याही स्तरावर खाली जाऊ शकतात आणि किती कट्टर संधीसाधू असू शकतात.

'आम आदमी' चा बुरखा घातलेल्या केजरीवाल सरकारने सुद्धा दिवसराज फॅक्टरी मालक, प्रॉपर्टी डीलर, आणि व्यापाऱ्यांची सेवा केली आहे. आम आदमी पक्षाच्या शासनकाळात दिल्लीमध्ये वेगवेगळ्या भागातील फॅक्टरी मालकांना भरभराटीची भरपूर संधी दिली गेली आहे. उदाहरणार्थ सेल्स टॅक्स विभागाच्या धाडी थांबल्या, नवीन कारखाने लावण्याकरिता परवानग्या कमी केल्या गेल्या, श्रम कायद्यांच्या अंमलबजावणीला जाणीवपूर्वक ढिले केले गेले. आता या सर्वांची शिक्षा मात्र भोगावी लागत आहे दिल्लीतील कामकरी लोकसंख्येला जी आपले हाड-मांस गाळून मालकांकरिता नफा निर्माण करत आहे. नुकतेच नोव्हेंबर मध्ये केजरीवालने पुन्हा एकदा किमान वेतनात वाढ जाहीर केली आहे. सर्वांना माहित आहे की ही वाढ म्हणजे फक्त कागदावरची घोषणा आहे, अजून काही नाही. जमिनीवरचे वास्तव तर हे आहे की दिल्लीतील कामकरी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात किमान वेतनाच्याही खाली खटत राहते.

दिल्लीतील कामगारांना गेल्या पाच वर्षांमध्ये महागाई, अनियोजित लॉकडॉऊन मध्ये खाण्यापिण्याची गैरसोय आणि घरि जाण्याची गैरसोय, पावसाळ्यात कामगार वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याचा प्रश्न, किंवा कचऱ्याच्या ढिगाच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागले आहे. या प्रश्नांवर केजरीवाल सरकारने काही केले तर नाहीच, पण आता आपल्या नरम हिंदुत्ववादी अजेंड्याला अंमलात आणण्याचा पूर्ण प्रयत्न चालू आहे. सरकारने गेल्या

पान 13 वर

# मराठी पाट्यांच्या निमित्ताने : भाषिक अस्मितेच्या सडलेल्या राजकारणाला गाडून टाका!

**राहुल**

"मराठी भाषेच्या" पाट्या लावण्याचा निर्णय पुन्हा एकदा सरकारने जाहीर केला आहे आणि या निमित्ताने मराठी भाषिकांना चुचकारण्याचे राजकारण पुन्हा एकदा शिवसेना, मनसेने चालू केले आहे. कामगार वर्गाने या भाषिक अस्मितावादी राजकारणाचे वास्तव समजावून घेऊन त्याला पुरते गाडून टाकले पाहिजे.

दुकानांच्या पाट्या बदलल्यामुळे त्यांमधील वस्तू आपल्या घरी येतील का? दुकानांच्या पाट्या बदलल्याने आपल्यापैकी ज्यांना लिहिता-वाचताच येत नाही त्यांना लिहिता-वाचता येईल का? दुकानांच्या पाट्या बदलल्याने आपल्या मुला-मुलींच्या मराठी किंवा कोणत्याही भाषा शिकण्यासाठी वेगळी सोय होईल का? पाट्या बदलण्याची फुकाची अस्मिता बाळगून आपल्या हाती काही लागणारच नाहीये! तेव्हा या निमित्ताने भाषिक अस्मितेचे जे राजकारण चालते, त्याला कामगार वर्गाने गांभीर्याने समजले पाहिजे आणि आपल्या वर्गहिताच्या विरोधात जाणाऱ्या या विचाराला नेस्तनाबूत केले पाहिजे.

"पाट्यां"पासून चालू झालेला हा अस्मितेचा विचार विविध मार्गांनी समोर येताना दिसतो. "भूमीपुत्रां"च्या नावाने तो फक्त स्थानिकांना रोजगाराची मागणी करतो, परभाषिकांमुळे रोजगार जातात किंवा मजुरी पडते असाही विचार रुजवला जातो आणि तो विविध प्रदेशातील कामगारांना एकमेकांविरोधात उभा करतो. महाराष्ट्रात मराठी भाषा इतरांवर थोपवली गेली पाहिजे असे म्हणत इतर भाषिकांना कमीपणाची वागणूक मिळाली पाहिजे अशीही भावना तो रुढ करतो. आम्ही ते इथले आणि बाकी ते बाहेरचे असा विचार मनात रुजवतो. यातूनच मराठी विरूद्ध बिहारी, गुजराती विरुध्द हिंदी अशा कामगारांमधल्या संघर्षाला तो जन्म देतो. याच विचारांच्या प्रभावी फक्त देवनागरीतील (एक गौण मुद्दा, पण पाट्या खरेतर मराठीत लागणारच नाहीत. पाट्यांकरिता फक्त 'देवनागरी' लिपीतील अक्षरे वापरली जातील. म्हणजे "मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स" असे इंग्रजी नाव चालेल, फक्त त्याला अक्षरं मात्र देवनागरी लिपीतील पाहिजेत असा नियम लागू होईल.) पाट्या पाहिल्या की आपल्यातील काही जण खूशही होतात. अशा विचारांना स्विकारून आपण आपल्याच पायावर दगड मारून घेत आहोत याची जाणीव आपल्याला होत नाही, कारण आपण आपल्या वर्गहितांना नीट ओळखत नाही.

सर्वप्रथम हे लक्षात घेणे आवश्यक आहे की बेरोजगारीचे कारण आपल रोजगार दुसरा कोणीतरी हिसकावून घेतो हे नाहीच! लोकसंख्या जास्त आहे, किंवा शिक्षण कमी आहे, किंवा लायकी कमी आहे, किंवा यंत्र आली, किंवा नशिब वाईट आहे ही बेरोजगारीची कारणं नाहीतच! बेरोजगारीचे एकमेव कारण हे आहे की आपण भांडवलशाही व्यवस्थेत जगतो, जी सर्वांसाठी रोजगार निर्माण करूच शकत नाही! भांडवलशाहीमध्ये जमीन, खाणी, कारखाने, रस्ते, दळणवळण, बँका, ज्ञान अशा सर्वच भांडवलरुपी उत्पादनाच्या बहुतांश साधनांवर देशातील 135 कोटी लोकांपैकी 15-20 कोटी लोकांची मालकी आहे, आणि ते नफ्याकरिता उद्योग चालवतात, रोजगार देण्याकरिता नाही. तुम्ही आणि तुमच्या आजूबाजूला काम करणाऱ्या सर्व लोकांना आज किरकोळ मजुरी घेऊन आयुष्यभर 10-12 तास काम करण्याची सक्ती आहे, कारण आपल्याकडे उत्पादनाची साधने नाहीत! आपण जितके जास्त काम करु, तितके मालक जास्त श्रीमंत होणार, कारण सर्व संपत्ती फक्त कष्ट करणारेच निर्माण करतात पण राबणाऱ्यांना मिळते नाममात्र मजुरी आणि मालकांना मिळते उरलेले सगळे नफ्याच्या रुपाने. तेव्हा ही **भांडवलशाही कमीत कमी लोकांना जास्त काम करायला लावणारी व्यवस्था आहे आणि म्हणूनच ती सर्वांकरिता रोजगार निर्माण करू शकत नाही!** इतकेच नाही तर बेरोजगारी आहे म्हणून मालक कामगारांना स्पर्धा करायला लावून मजुरी पाडतात आणि अजून नफा कमावतात. तेव्हा बेरोजगारी टिकली पाहिजे ही सर्व भांडवलदार मालकांची इच्छा सुद्धा आहे!

जर नफ्याकरिता चालणारी व्यवस्था नसती, कामगारवर्गाच्या ताब्यातील सत्ता असती, सर्व उत्पादन साधनं कामगाराच्या मालकीची असती तर कामाचे तास 12 वरून 6 काय कदाचित 4 वर आणून; पुरेशी शाळा-कॉलेज-दवाखाने बांधून, सर्वांना घरांचे प्रकल्प, सर्वांसाठी वाहतूक सुविधा निर्माण करून, स्वच्छता-आरोग्य सुविधा, प्रत्येकाला विकासाची संधी देऊन कला-मनोरंजन-खेळ-संगितासारख्या क्षेत्रात प्रत्येकाला संधी देऊन, आणि अशा असंख्य मार्गांनी 135 कोटी लोकांची प्रत्येक गरज भागवण्यासाठी, तेवढे निर्माण करण्यासाठी, प्रत्येकाच्या जीवनाच्या गरजा भागवणारा रोजगार नक्कीच शक्य आहे.

पण भांडवली व्यवस्थेत मराठी असो, वा बिहारी वा तामिळ, कोणता मालक-ठेकेदार-बिल्डर-व्यापारी आपल्या भाषेच्या कामगारांना जास्त मजुरी देतो? अजिबात नाही! कोणत्याही मालकाला फक्त स्वस्तात आपली श्रमशक्ती विकणारे कामगार हवेत! म्हणूनच डोळे उघडून पहाल तर दिसेल की शिवसेना, मनसे सारख्या पक्षांचे अनेक नेते गैर-मराठी भांडवलदार आहेत, आणि या पक्षांचे मराठी-भांडवलदार नेते सुद्धा स्वस्तात मिळाले तर गैर-मराठी कामगारांना कामावर ठेवतात. तेव्हा आपले शत्रू इतर-भाषिक कामगार नाहीत तर सर्वभाषिक भांडवलदार आहेत !

आज अर्थव्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपामुळे प्रत्येक भाषिक कामगाराला (हिंदी, मराठी, तामिळ असे कोणीही असो) आपल्या राज्यातून दुसऱ्या राज्यात कामाला जावे लागते. कामगार जेथेही जातो, मेहनत करून, संपत्ती निर्माण करतो आणि त्याचाच एक वाटा मजुरी म्हणून घेतो. परंतु मालक मात्र कुठे जावोत वा ना जावोत, ऐतखाऊच असतात आणि बिना-मेहनतच श्रीमंत होत जातात! इतकेच नाही तर पुणे-मुंबई सारख्या शहरांमध्ये येणाऱ्या कामगारांपैकी 85 टक्क्यांपेक्षा जास्त कामगार हे राज्यांतर्गत विस्थापित असतात, तर फक्त 15 टक्के बाहेरील राज्यातून आलेले. त्या अर्थाने तर सर्वच कामगार हे 'बाहेरचे' आहेत असे म्हणावे लागेल.

सर्वांना काम का मिळत नाही हा प्रश्न उपस्थित होऊ नये म्हणूनच मालक वर्गाने पोसलेले शिवसेना-मनसे सारखे पक्ष महाराष्ट्रात, तर भाजप सारखे पक्ष हरियाणात, काँग्रेस सारखे पक्ष गुजरातमध्ये, द्रमुक सारखे पक्ष तामिळनाडूमध्ये, एजीपी सारखे पक्ष आसाममध्ये भूमीपुत्र विरूद्ध इतर असे झगडे उभे करतात; स्थानिकांना रोजगारामध्ये आरक्षणाची मागणी करतात आणि कामगारांनाच कामगारांचे शत्रू म्हणून उभे करतात. थोडक्यात सर्वच भांडवली राजकीय पक्ष प्रादेशिक अस्मितेचा खेळ खेळतच असतात, कारण कामगारांना देण्यासारखे त्यांच्याकडे काहीच नसते!

मराठी भाषेबद्दलच बोलायचे तर मराठी शाळांना वाऱ्यावर सोडून, शिक्षणाचे खाजगीकरण करून, मराठी शाळांना परवानगी नाकारून, मराठी भाषेतील तंत्रज्ञानाकरिता कोणतेही ठोस काम न करता, मराठीच्या प्रचार-प्रसार-विकासा करिता कोणतीही गंभीर योजना हाती न घेता, मराठी बोलणाऱ्या कोट्यवधी कामगार-कष्टकऱ्यांकरिता इतर शिक्षण सोडाच भाषाही शिकवण्याकरिता कोणतेही गंभीर प्रयत्न न करता शिवसेना-मनसे सारख्या पक्षांकडून मराठी भाषेच्या नावाने फक्त पाट्या टाकण्याचे काम चालले आहे! हीच स्थिती इतर अनेक राज्यांमध्येही आहे!

आज आपण मागणी केली पाहिजे की महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला तिच्या निवडीच्या भाषेमध्ये शिकण्याचे, व्यवहार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे आणि कोणतीही भाषा कोणावरही थोपवता कामा नये. सर्व प्रकारच्या संपर्क भाषा (उदा: हिंदी, इंग्रजी, वा लोक निवडतील त्या) शिकवण्याची सोय शासनाने केली पाहिजे. हीच मागणी आपण इतर राज्यांमध्येही केली पाहिजे जेणेकरून तेथे जाणाऱ्या मराठी भाषिक कामगारांनाही मराठीत व्यवहार करता येईल. यालाच आपण भाषेबद्दलच्या सुसंगत लोकशाहीची भुमिका म्हणतो. कामगार वर्गाची रोजगाराबद्दल ही भुमिका ही असली पाहिजे की मेहनत करण्याची तयारी असलेला प्रत्येक जण या देशाचा समान अधिकारी आहे आणि प्रत्येकाला रोजगार देणे ही सरकारची जबाबदारी असलीच पाहिजे. प्रत्येकाला नियमित रोजगाराची हमी देणारा मूलभूत अधिकार मिळालाच पाहिजे, हीच आपली मागणी असली पाहिजे.

मेहनत करणाऱ्यांमध्ये भाषा, प्रांत, जात, धर्म, लिंग अशा कोणत्याही आधारावर फरक करणारी प्रत्येक विचारधारा ही कामगार वर्गाची शत्रू आहे आणि अशा विचारधारांना गाडूनच आपण कामगारवर्गीय विचारांच्या आधारावर खऱ्या अर्थाने एकजूट होऊ शकतो आणि एक क्रांतिकारी शक्ती बनून ही नफ्याची दुनिया नष्ट करण्यासाठी लढू शकतो.

# हे सर्व खोटे आहे! हे कधीच घडले नव्हते! आता 2008 च्या मालेगाव बॉम्बस्फोटातील हिंदुत्ववादी आरोपींना निर्दोष सिद्ध करण्याची तयारी!

पान 3 वरून

चरित्र पूर्वीपासून निश्चितच होते, पण भाजप सत्तेत आल्यानंतर तर त्याला फक्त प्रचंड बळ मिळालेली नाही, तर आता त्याला नियोजनबद्ध पद्धतीने सर्व लोकशाही यंत्रणांमध्ये पेरले गेले आहे. मीडीया, एन.आय.ए. पासून ते ए.टी.एस. पर्यंत तपास यंत्रणा, सर्व सरकारी कार्यालये, न्यायपालिका, शिक्षणसंस्था, मानवाधिकार आयोग, अशा असंख्य ठिकाणी हिंदुत्ववादी विचारांच्या लोकांची भरती केली गेली आहे.

याला सूत्रबद्धपणे समजण्यासाठी अगोदर हे समजणे आवश्यक आहे की भाजपचे सत्तेवर येणे ही देशातील भांडवलदार वर्गाची गरज बनली होती. गेले दशकभर देशात आर्थिक संकट वाढत आहे. अशा काळात जनतेच्या कामगारवर्गाच्या वाढत्या असंतोषाला नियंत्रित ठेवायला आणि चिरडायला सुद्धा भांडवलदार वर्गाला "लोहपुरुषां"ची आणि दमनकारी शक्तिंची गरज भासते. ही गरज भारतात संघ आणि संघप्रणीत भाजप पुरवतो. त्यामुळेच 2014 सालापासून मोठमोठ्या भांडवलदारांच्या पैशांच्या थैल्या, मुख्यत्वे भाजपसाठीच खुल्या आहेत, त्यांद्वारे नियंत्रित मीडीया मोदीगाथा गात असतो, आणि फॅसिस्टांच्या संघटना यंत्रणेच्या माध्यमातून सत्तेच्या सर्व अंगांवर आपले नियंत्रण वाढवणे हे भांडवलदारांचे उद्दिष्ट आहे.

परंतु देशातील अनेक उदारवादी विचारांचे लोक मात्र याला फक्त वरवर पहात लोकशाही संस्था वाचवण्याकरिता टाहो फोडतात. ब्रेख्तने म्हटल्याप्रमाणे, "जे भांडवलशाहीला विरोध न करता फॅसिझमला विरोध करतात, ते रानटीपणा निर्माण करणाऱ्या रानटीपणाबद्दल शोक करतात, ते वासराची कत्तल न करता मांस खाणाऱ्यांसारखे आहेत. त्यांना वासराला खायचे आहे पण रक्त बघायला आवडत नाही. मांसाचे वजन करण्यापूर्वी कसायाने हात धुतल्यास ते सहज समाधानी होतात. ते रानटीपणाला जन्म देणाऱ्या मालमत्तेच्या संबंधांच्या विरोधात नाहीत, ते केवळ रानटीपणाच्या विरोधात आहेत. ते रानटीपणाच्या विरोधात आवाज उठवतात, आणि ते असे करतात जेथे असे संपत्तीचे संबंध प्रचलित आहेत, परंतु जेथे मांस तोलण्यापूर्वी कसाई हात धुतो."

आज एकीकडे जनतेला जातीधर्माच्या मुद्यांवर लढवले जाते आहे, तर दुसरीकडे फॅसिस्ट सत्ता फक्त आपला जगण्याचाही हक्क हिसकावून घेऊन भांडवलदारांच्या तिजोरीत आपले रक्त आणि घाम भरण्याचे काम करत आहे. हे समजणे आवश्यक आहे की याविरोधात फक्त कायदेशीर लढाया वा मुद्दाधारित संघर्ष वा संसदीय निवडणुकांमधील संघर्ष कामाचे नाहीत. जोपर्यंत कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली फॅसिस्टांची पाठराखण करणाऱ्या भांडवलशाहीच्या विरोधात एक क्रांतिकारी आंदोलन उभे रहात नाही, तोपर्यंत फॅसिस्टांच्या सर्व यंत्रणांमधील घुसखोरीला खरे आव्हान उभे राहू शकत नाही.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (आठवे पुष्प)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात केली आहे. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू.

**या साखळीतील पहिल्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणून घेतले की कामगारांनी कशाप्रकारे भांडवलाच्या सत्तेविरोधात लढण्याची सुरुवात केली आणि कशाप्रकारे चार्टीस्ट आंदोलन आणि 1848 च्या क्रांत्यांमधून जात कामगार वर्गाची चेतना आणि संघटितपणा वाढत गेला. आपण कामगारांच्या मुक्तीच्या वैज्ञानिक विचारधारेचा विकास आणि कामगारांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेबद्दल (इंटरनॅशनलबद्दल) जाणले. गेल्या अंकात आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशाप्रकारे झाली आणि तिच्या रक्षणाकरिता कामगार वर्गीय जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. आपण हे देखील पाहिले की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या नियमांना इतिहासात पहिल्यांदा व्यवहारात कसे लागू केले आणि हे दाखवले की "जनतेची सत्ता" खरोखर काय असते. आता आपण त्या चुकांवर नजर टाकूयात ज्यांच्यामुळे कम्युनचा पराजय झाला. या चुकांना योग्य रितीने समजणे आणि भांडवलशाही विरोधात निर्णायक लढाईत विजयासाठी त्यातून धडे घेणे कामगारवर्गासाठी अत्यंत आवश्यक आहे.**

— संपादक मंडळ

## कम्युनने शिकवले – भांडवलशाही विरोधातील लढाईत उदारता, शिथिलपणा, आणि धाकधुक यांचा परिणाम म्हणजे रक्तरंजित पराभव.



पॅरिसचे वीर कम्युनार्ड बहादुरीने लढत होते परंतु शेवटी त्यांना भांडवलशाहीच्या एकत्रित शक्तीपुढे हार मानावी लागली. फ्रांसच नाही तर संपूर्ण युरोपचे भांडवलदार कामगारांच्या या राज्याला धुळीत मिळवण्यासाठी एकजूट आणि उतावीळ झाले होते. कम्युनार्डांच्या जबरदस्त लढाईमुळे ते भयभीत झाले होते परंतु धूर्त शिकाऱ्या प्रमाणे ते कामगारांच्या चुकांची ते वाट बघत होते आणि कोणत्याही चुकीचा फायदा घेण्यासाठी एकही संधी ते सोडत नव्हते. आणि धैर्याने लढूनही कम्युनच्या रक्षकांनी त्यांना त्याची ताकद एकवटण्यासाठी आणि हल्ला करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. या गोष्टीला नीट समजून घेण्याची आणि त्यापासून शिकण्याची गरज आहे.

चित्र: शत्रूकडून हिसकावलेल्या एका तोफेसोबत पॅरिसच्या कामगारांची एक संरक्षण फळी

**1.** कम्युनच्या बरबादीचे कारण हे होते की, कम्युनच्या स्थापनेच्या वेळी आणि नंतर दोन्ही वेळेला शिस्तबद्ध, संगटित क्रांतिकारी नेतृत्वाचा अभाव होता. कामगार वर्गाचा कोणताही एकताबद्ध आणि विचारधारात्मक रूपाने मजबुत राजकीय पक्ष नव्हता जो जनतेच्या या प्रारंभिक उठावाचे नेतृत्व करेल. नेतृत्वासाठी काही गटामध्ये स्पर्धा झाली, ज्यांमध्ये प्रुधोंवादी, ब्लांकीस्ट आणि आंतराष्ट्रीयवादी हे गट सगळ्यात जास्त लोकाचे प्रतिनिधित्व करत होते.त्यामुळे कम्युन मध्ये सतत भ्रमाची आणि अनिर्णयाची स्थिती राहिली, योजना आणि दुरदृष्टीचा अभाव राहिला. डावपेचांचा अभाव आणि जोमाने वाढणाऱ्या क्रांतिकारी परिस्थितीमध्ये सुद्धा दैनंदिन पद्धतीने काम करणे या नेत्यांची सवय बनलेली होती.

**2.** कम्युनच्या सुरवातीच्या उठावाच्या काळात जो काही थोडासा प्राधिकार (अथोरिटी) होता, तो सुद्धा त्यांनी नंतर सोडून दिला. जसे की, 12 एप्रिल 1871 मध्ये मार्क्सने आपला मित्र कुगलमन याला लिहिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले होते की, "नॅशनल गार्ड)च्या केंद्रीय समितीने आपली पकड खूप लवकर सोडून दिली आणि कम्युनला हस्तांतरीत केली.". मार्क्स जे केंद्रियतावादाचे पुरस्कर्ता होते, ही गोष्ट समजून चुकले होते की कामगार सेनेला आपल्या अधिकारात एकत्रित ठेवणाऱ्या केंद्रिकृत क्रांतिकारी अथोरिटीच्या नेतृत्वामध्येच थियेर सरकारच्या विरुद्ध एक यशस्वी राजकीय संघर्ष चालवला जाऊ शकत होता. नॅशनल गार्डच्या केंद्रिय समितीचा असाच प्राधिकार होता; परंतु आपल्या शक्तींना तिलांजली देवून आणि आपला अधिकार ढिल्या-ढाल्या पद्धतीने संघटित कम्युनला हस्तांतरित करून त्यांनी आपल्या सशस्त्र सेनेच्या क्रांतिकारी उर्जेला विखरून टाकले.

**3.** असे असतानाही, कम्युनच्या कमतरतेचे विश्लेषण करण्यासोबतच, मार्क्सने कम्युनार्डांच्या क्रांतिकारी जोशाबद्दल जबरदस्त उत्साह दाखवला. वर आपण कुगलेमान यांना लिहिलेल्या ज्या पत्राचा उल्लेख केला आहे, ते कम्युनच्या घोषणे नंतर तीन आठवड्यांनी लिहिले होते. पत्रामध्ये मार्क्सने उत्कट उत्साहाने लिहिले होते की "काय नैपुण्य! या पॅरिसवासियानी कसा ऐतिहासिक पुढाकार, आत्मोसार्गाचे कसे सामर्थ्य दाखवले आहे. सहा महिन्यांच्या भूक आणि बरबादी नंतर, जी विदेशी शत्रूपेक्षा आतील घातपात्यांमुळे जास्त होती, ते प्रशियाई बंदुकांच्या सावलीत अशा प्रकारे उठून उभे राहिले जणू काही फ्रांस आणि जर्मनीमध्ये युद्ध चालूच नव्हते, जसे काही पॅरिसच्या उंबरठ्यावर शत्रू उभाच नव्हता. इतिहासात अशा शौर्याचे कोणतेही उदाहरण नाही."

आणि त्यानंतर मार्क्सने त्या चुकीवर टिका केली जी कम्युनच्या सगळ्या चुकांमधील मोठी चूक होती. "जर त्यांचा पराजय झाला तर तो त्यांच्या उदार हृदयामुळे झाला असेल. ज्या क्षणी विनी आणि नॅशनल गार्ड्चा प्रतिक्रियावादी हिस्सा पॅरिसमधून पळाला, तसा त्यांनी व्हर्सायवर हल्ला केला पाहिजे होता. 'प्रामाणिकपणापोटी' हाती आलेली संधी गमावली. ते गृहयुद्ध सुरू करू इच्छित नव्हते – जणू काही नृशंस थियेरने पॅरिसला निशस्त्र करण्याच्या प्रयत्नातून गृहयुद्धाची सुरवात केलीच नव्हती."

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (आठवे पुष्प)



कामगारांच्या पॅरिसचे रक्षण करताना सक्रिय शूर स्त्री-पुरुष

**4.** क्रांतिकारी रणनितीकार, मार्क्स, ही गोष्ट समजून चुकले होते की, जेव्हा पॅरिसचा शत्रू पळत होता तेव्हा नॅशनल गार्डची जबाबदारी होती की त्याला पुन्हा शक्ती एकत्रित करू न देता आणि पॅरिसच्या कामगारावर परत हल्ला करण्याची संधी न देता, थियेरच्य पराजित सेनेचा पाठलाग करून त्यांना नेस्तनाबूत केले पाहिजे होते. परंतु कम्युन ही गोष्ट समजू शकली नाही. कम्युनच्या नेत्यांच्या दयाळूपणामुळे ज्यावर मार्क्सने इतकी टीका केली आहे , थियेर सरकारला आणि त्याच्या प्रतिक्रियावादी समर्थकांना शांतपणे व्हर्सायला जाण्यासाठी आणि तेथे आपली ताकदीला पुन्हा संघटित करून कम्युनच्या विरोधात षंडयंत्र रचण्याची संधी दिली. याच उदारतेमुळे त्यांनी त्या प्रमुख बुर्झ्वा नेत्यांना बंदिवान बनवले नाही जे शहरातच राहिले होते आणि ज्यांनी घरभेद्यांच्या रूपाने काम करत प्रतिक्रांतिकारी घटनांचे केंद्र बनवण्यासाठी या संधीचा फ़ायदा घेतला. परंतु जर कम्युनने या सैनिकी गटांकडून, जे प्रतिक्रियावादी सरकारच्या प्रभावाखाली होते, हत्यारं काढून घेतली असती आणि त्यांना शहरातच रोखून धरले असते तर त्यांच्यापैकी एका मोठ्या गटाला आपल्या बाजूला वळवता आले असते आणि दुसऱ्यांना तटस्थ ठेवता आले असते. त्या ऐवजी त्यांना मुक्तपणे व्हर्सायला जाण्याची आणि तेथे प्रतिक्रियावादी सैन्याच्या सतत संरक्षणात राहण्याची संधी दिली गेली.





व्हर्सायच्या सत्तेने अटक केलेल्या कम्युनार्डांसोबत जुलुम करण्यात कोणतीही कमतरता सोडली नाही. वरील फोटोत पकडलेल्या कम्युनार्ड स्त्री-पुरूषांना जेलमध्ये गोळी मारली जात आहे.

**5.** पॅरिस कम्युन कामगार वर्गाचा सत्तेसाठीचा संघर्ष होता. संधर्षाच्या विकासासोबत पॅरिसच्या कामगारांनी जो बदल बघितला तो फक्त प्रशासनामध्ये बदल नव्हता. त्यांच्या नेत्यामध्ये सर्वाधिक स्पष्ट समजदारी असणारे लोक,आंतरराष्ट्रीयच्या सिद्धांतावर चालणारे लोक जाणून होते की हा संघर्ष क्रांतीचे रूप धारण करत आहे, परंतु ते आणि इतर लोक या संघर्षाला दिशा देणारे डावपेच बनवण्यात अपयशी राहिले. कुगेलमानला लिहिलेल्या दुसऱ्या पत्रात(17 एप्रिल) मार्क्स ने खालील शब्दात आपली व्याख्या ठेवली होती. “पॅरिस कम्युनमुळेच हे शक्य झाले की भांडवलदार वर्ग आणि त्याच्या सत्तेच्या मशिनरी विरूद्ध संघर्षाने एका नव्या टप्प्यात प्रवेश केला. याचा अंत काहीही होवो, आंतराष्ट्रीय महत्वाची घटना एक घडून चुकली आहे.”


पॅरिसच्या कामगाराना या संघर्षात उतरावे लागेल या मार्क्सच्या वक्तव्याबद्दल लेनिनने लिहिले की “मार्क्सला या गोष्टीची जाणीव होती की इतिहासात काही क्षण असे येतात की यशाची खात्री नसताना सुध्दा जनतेच्या भावी शिक्षणासाठी आणि पुढील संघर्षाच्या अभ्यासासाठी जनतेचा संघर्ष आवश्यक बनतो.”



बुर्झ्वा सेनेने पॅरिसमध्ये घडवलेल्या बरबादीचा नजारा




कम्युनला चिरडून टाकल्यानंतर हजारोच्या संख्येने कामकऱ्यांना पकडले गेले. अनेकांना मारून टाकले गेले आणि हजारोंना देशातून हाकलून दिले गेले.




पॅरिसच्या प्रत्येक तुकड्यासाठी घनघोर युद्ध झाले. शेवटपर्यंत कम्युनार्डांनी शौर्याने प्रतिकार केला. शहरातील एका रस्त्यावरील लढाईचे दृष्य.


# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (आठवे पुष्प)

6. चर्चला राज्यसत्तेपासून वेगळे करणे, चर्चच्या संपत्तीचे सत्तेद्वारे अधिग्रहण, उध्वस्त झालेल्या कंपन्या आपल्या ताब्यात घेणे, कामगारांवर दंड लावण्यासंबंधीचे सर्व नियम संपवणे, बेकरीमध्ये रात्रीच्या वेळी काम करण्यास बंदी घालणे या कम्युन व्दारे लागू केले गेलेले कायदे सामाजिकदृष्ट्या महत्वाची कामं होती. ती कामगारांच्या अशा सरकारची कामं होती जे कामगार हिताचे कायदे बनवत होते.

परंतु कम्युनने सर्व कारखाने आपल्या ताब्यात घेतले नव्हते. त्यांनी बँक ऑफ फ्रांसला आपल्या ताब्यात घेतले नव्हते.उलट ते आपल्या क्रांतिकारी उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी बँकेकडे कर्ज मागायला गेले. बँकेला आपल्या ताब्यात न घेणे ही कम्युनची अजून एक मोठी चूक होती. या धनाचा वापर कम्युनला चिरडण्यासाठी केला गेला.


**वर्सायच्या सेनेने पॅरिसवर ताबा मिळवल्यावर सगळीकडे अत्यंत क्रुर हत्याकांड चालवले. हाताच्या घट्ट्यावरून ओळखले जात होते की एखादा व्यक्ती कामगार आहे आणि त्याला गोळी घातली जात होती. चित्रात गोळ्या घातलेल्या कम्युनार्डांच्या शवपेट्या. ही दृश्य कधीच आमच्या स्मृतीतून ढळली नाही पाहिजेत.**





**7.** कम्युनने जरी राज्याची सत्ता आपल्या ताब्यात घेतली होती, त्यांनी सत्तेच्या जुन्या साच्यातच राज्यकारभार चालवण्याचा प्रयत्न केला. मार्क्सने 1 एप्रिलच्या आपल्या पत्रात या विरूद्ध इशारा देत लिहिले होते की, “नोकरशाही राजकीय यंत्रणेला नष्ट करणे” ही कामगार क्रांतीची एक पूर्वशर्त होती. कम्युनच्या मुल्याकंनासंबंधी फ्रांसमधील गृहयुद्ध या आपल्या क्लासिकल लिखाणात, जे कम्युनच्या पराजयानंतर दोन दिवसानी आंतरराष्ट्रीयच्या पहिल्या सर्वसाधारण परिषदेच्या बैठकीत संबोधनाच्या रूपात प्रस्तुत केले होते, मार्क्सने या विषयावर आपले लक्ष केंद्रीत केले आणि हा सैद्धांतिक निष्कर्ष सादर केला, “कामगार वर्ग कार्यरत असलेल्या सत्तेच्या यंत्रणेला जसेच्या तसे हातात घेवू शकत नाही आणि आपला उद्देश साध्य करण्यासाठी तिचा वापर करू शकत नाही.”

**8.** 1891 मध्ये कम्युनच्या 20व्या वर्षपूर्ती निमित्त एंगेल्सने फ्रांसमध्ये गृहयुद्ध लेखाच्या नव्या जर्मन आवृत्तीची भूमिका लिहिली. बँक ऑफ़ फ्रांसला आपल्या ताब्यात न घेण्याची व आपल्या हितामध्ये वापर न करण्याची टीका करत एंगेल्स हे रेखांकित करतात की कम्युनने सत्तेची जुनी यंत्रणा नष्ट न करता तिचा वापर करण्याचा प्रयत्न केला. मार्क्सने आपल्या ‘संबोधनात’ ज्या गोष्टीची चर्चा केली होती, त्याच गोष्टीवर भर देत एंगेल्स म्हणतात की, “कम्युनला हे समजले पाहिजे होते की, सत्तेवर ताबा मिळवल्यानंतर कामगार राज्यसत्तेच्या त्या जुन्या मशिनरीला वारून शासन करू शकत नव्हते, ज्या यंत्रणेव्दारे कामगारांचे शोषण केले जात होते.” एंगेल्स या निष्कर्षाला जाऊन पोहोचले की “राजेशाही प्रमाणेच कोणत्याही लोकशाही गणतंत्रामध्ये सुद्धा राज्यसत्ता ही एका वर्गाद्वारे दुसऱ्या वर्गाच्या छळवणुकीच्या साधनाशिवाय काहीच नसते.”



**वर आणि खालील उजव्या बाजूच्या चित्रात पॅरिसमध्ये आपली शेवटची लढाई लढताना कम्युनार्ड.**

**खाली डाव्या बाजूला: कम्युनच्या पराजयानंतर कामगारांकडून हिसकावलेली हत्यारे नष्ट करताना व्हर्सायचे सैनिक.**



DESTRUCTION DES ARMES PRISES AUX INSURGES.



पुढील अंकात चालू

# कामगार वर्गाचा राजकीय पक्ष कसा असावा?

✍सनी

प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधित्व त्या वर्गाचा राजकीय पक्ष किंवा अनेक पक्ष करतात. भारतात अनेक पक्ष आहेत जे वेगवेगळ्या वर्गांचे समर्थन करतात किंवा शासक वर्गाच्या एखाद्या हिश्श्याच्या हितांचे प्रतिनिधित्व करतात. भाजप आणि काँग्रेस हे मूळात आणि मुख्यत्वे मोठ्या भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. हे दोन्ही पक्ष भारतातील मोठ्या वित्तीय-औद्योगिक भांडवलाच्या हितांना उचलून धरतात.

यासोबतच, तृणमूल काँग्रेस, राजद, जदयू, अण्णाद्रमुक, द्रमुक, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे सारखे विविध पक्ष हे मध्यम आणि प्रादेशिक भांडवलदार वर्गाचे आणि/किंवा धनिक शेतकरी-कुलकांचे प्रतिनिधी आहेत जे देशभरामध्ये हडपल्या जात असलेल्या अतिरिक्त मूल्यामधील आपल्या वाट्याला वाढवण्यासाठी मोठ्या भांडवलदार वर्गासोबत रस्साखेची करत राहतात. परंतु या तुलनेने छोट्या भांडवली पक्षांना आणि प्रादेशिक पक्षांना जेव्हाही संधी मिळते तेव्हा ते मोठ्या भांडवलदार वर्गाची सेवा करण्याची संधी सोडत नाहीत. दुरुस्तीवादी पक्ष, म्हणजे नावाने 'कम्युनिस्ट' पण वास्तवात भांडवलदार वर्गाची सेवा करणाऱ्या पक्षांना जसे की भाकप, माकप, भाकप(माले), एसयुसीआय हे सर्वसाधारणपणे छोट्या आणि मध्यम भांडवलदार वर्ग, कृषक भांडवलदार वर्ग आणि छोट्या व मध्यम व्यापाऱ्यांच्या कानात 'हळू चला-हळू चला' चा मंत्र फुंकत राहतात जेणेकरून संपूर्ण भांडवली व्यवस्था सुरक्षित राहील. हे सर्व पक्ष भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांचे प्रतिनिधित्व करतात.

भांडवलदार वर्गाचे स्वरुप आणि चरित्रच असे असते की त्याला अनेक राजकीय पक्षांची गरज असते. त्याचे कारण हे आहे की भांडवलदार वर्गाचे विविध गट आपसात स्पर्धा करतात आणि ही स्पर्धाच खरेतर त्यांना एका वर्गाचय रूपात घडवते. त्यामुळेच मार्क्सने म्हटले होते की भांडवलदार वर्गाचे शत्रुत्वरूपी भातृत्व बाजारात स्पर्धेच्या रूपाने निर्माण होते. शत्रुत्वरूपी यामुळे कारण की भांडवलदार एकमेकांशी गळाकापू स्पर्धा करत असतात आणि भातृत्व यामुळे कारण की मिळून कामागार वर्गाचे शोषण करतात आणि लुटीच्या मालामध्ये आपल्या भांडवलानुसार हिस्सेदारी करतात. भांडवलदार वर्गाचे अनेक पक्ष असण्याचे दुसरे कार्ण हे आहे की भांडवलदार वर्गाचे शासन हे भांडवलदार वर्गासाठी आणि त्याच्या चाकर वर्गांसाठी (उदाहरणार्थ शहरी आणि ग्रामीण उच्च-मध्यम वर्ग) 'लोकशाही' असते, परंतु व्यापक कामकरी जनतेसाठी भांडवली हुकूमशाही, म्हणूनच त्यांना अनेक मुखवट्यांची आवश्यकता असते, ज्यांना दर पाच, दहा, पंधरा वर्षांनी बदलण्याची गरज पडते. जेव्हा एखाद्या मुखवट्याबद्दल जनतेचा असंतोष वाढू लागतो आणि संयम ढळू लागतो तेव्हा दुसऱ्या एखाद्या मुखवट्याला समोर केले जाते.

प्रत्येक भांडवली पक्ष धर्म, प्रांत, भाषा किंवा जातीच्या नावावर जनतेला विभागून बुर्झ्वा (भांडवलदार) वर्गाची सेवा करतो. अकाली दलापासून, ते राष्ट्रवादी काँग्रेस आणि चौटालाच्या 'इनेलो' पक्षापर्यंत मुख्यत्वे स्थानिक भांडवलदार वर्ग आणि धनिक शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष आहेत. आम्ही वर सांगितल्याप्रमाणे नकली दुरुस्तीवादी पक्ष भांडवलदार वर्गाचेच प्रतिनिधित्व करतात. ते मुख्यत्वे **छोटा भांडवलदार वर्ग, मोठा आणि मध्यम शेतकरी, मध्यम आणि छोटे व्यापारी आणि संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या उच्च श्रेणीच्या नियमित कर्मचाऱ्यांच्या वर्गाचा एक हिस्सा (जो उच्चभ्रू कामगार वर्गामध्ये परिवर्तित झाला आहे) यांची सेवा करतात.** हे पक्ष आज काँग्रेस आणि भाजपप्रमाणे चाराणे सदस्यतेचे पक्ष बनले आहेत.

कामगार वर्गाचा आपला स्वत:चा पक्ष असतो, परंतु तो भांडवलदार वर्गाच्या पक्षाप्रमाणे नसतो. तो कामगार वर्गाची विचारधारा म्हणजे मार्क्सवादी विज्ञान आणि तत्वज्ञानावर आधारित असतो. मार्क्सवादाच त्याकरिता होकायंत्राचे काम करतो आणि त्याला दिशा दाखवतो. मार्क्सवादच्या वैज्ञानिक विचारधारेच्या आणि तत्वांच्या उजेडात आणि क्रांतिकारी जनदिशेला लागू करूनच कामगार वर्गाचा क्रांतिकारी पक्ष आपली राजकीय दिशा आणि कार्यक्रम ठरवतो.

क्रांतिकारी जनदिशेचा अर्थ आहे व्यापक कामकरी जनतेमध्ये विखुरलेल्या अविकसित, अकेंद्रित, असंघटित योग्य विचारांना एकत्र करणे, त्यांच्या पायाभूत तत्वांना पकडणे आणि त्यांचे सामान्यीकरण करून एक योग्य राजकीय कार्यदिशा काढणे आणि नंतर या कार्यदिशेला जनतेमध्ये लागू करूनच तिच्या योग्य असल्याची पडताळणी करणे, आणि याच प्रक्रियेमध्ये तिच्यातील कमतरता दूर करून विकसित करत जाणे.

राजकीय कार्यदिशेचा अर्थ काय आहे? राजकीय कार्यदिशेचा अर्थ आहे कोणत्याही सामाजिक स्थितीमध्ये कामगार वर्गाच्या हितांना समोर ठेवून व्यवहाराची एक सर्वसाधारण दिशा. दुसऱ्या शब्दांमध्ये, कोणत्याही राजकीय-सामाजिक स्थितीमध्ये वर्ग संघर्ष आणि राज्यसत्तेच्या प्रश्नावर कामगारवर्गाची सर्वसाधारण पोहोच (approach), दृष्टीकोन आणि कामांची सर्वसाधारण दिशा. योग्य राजकीय कार्यदिशा ठरवण्यासाठी कामगार वर्गाचा पक्ष मार्क्सवादी विज्ञान आणि तत्वांच्या प्रकाशात (जे स्वत: सामाजिक व्यवहाराच्या अनुभवांचेच सामान्यीकरण आणि समाहार आहेत) क्रांतिकारी जनदिशेला लागू करून योग्य विचारांना जाणून घेतो आणि त्यांचे सामान्यीकरण करतो. फक्त मार्क्सवादी विज्ञान, तत्व आणि राजकीय कार्यदिशा आणि कार्यक्रमाच्या आधारावरच एखादा पक्ष कामगार वर्गाच्या अग्रदलाची भुमिका निभावू शकतो आणि आपल्या काळातील राजकीय कार्यभारांना पूर्ण करू शकतो. फक्त अशाच एका पक्षाच्या नेतृत्वामध्ये कामगार वर्ग एक राजकीय वर्ग बनू शकतो, म्हणजे एक असा वर्ग ज्याचे लक्ष्य राजकीय सत्ता मिळवणे आहे आणि आपली राज्यसत्ता स्थापित करणे आहे.

कामगार वर्गाच्या क्रांतिकारी पक्षाची संरचना ट्रेड युनियन सारखी नसते, तर फौलादी शिस्तीची आणि कॅडर आधारित असते. पक्षाचे सदस्यतेवर लेनिनचा 'कमी पण चांगला'चा नियम लागू होतो, ज्यानुसार प्रत्येक संपर्की कामगाराला पक्षाचे सदस्यत्व दिले जात नाही. कामगार वर्गाच्या पुढारलेल्या(उन्नत) हिश्श्याला जो राजकीय प्रश्नाला, म्हणजे राज्यसत्तेच्या प्रश्नाला विचारण्याची क्षमता बाळगतो वा विकसित करतो आणि फक्त आर्थिक मागण्यांभोवती घुटमळत न राहता संपूर्ण व्यवस्था आणि सत्तेचा प्रश्न उअचलू लागतो, आणि जो एका वैज्ञानिक दृष्टीकोनाला स्विकारतो, फक्त तोच पक्षाचे सदस्यत्व मिळवू शकतो. याशिवाय, कामगारांचा व्यापक जनसमुदाय पक्षाच्या भांडवलशाही-विरोधी समाजवादी कार्यक्रमाला स्विकारून पक्षासोबत विविध स्तरावर जोडला जाऊ शकतो. अशा कामगारांना आपण 'समाजवादी कामगार' म्हणू शकतो. लेनिनने त्यांच्या काळात अशा कामगारांना 'सामाजिक-लोकशाहीवादी कामगार' म्हटले होते कारण तेव्हा हा शब्द समाजवादी या शब्दाचा समानार्थी म्हणून रूढ होता.

कामगार वर्गाच्या पहिल्या पक्षाचा प्रयोग युरोपातील एकोणीसाव्या शतकाच्या दुसऱ्या हिश्श्यामध्ये झाला. श्रम आणि भांडवलाच्या ऐतिहासिक महासंघर्षामध्ये कामगार क्रांत्यांचे तीन मैलाचे दगड आहेत पॅरिस कम्युन, रशियन क्रांती आणि महान सर्वहारा सांस्कृतिक क्रांती. या ऐतिहासिक प्रवासात पक्षाची संकल्पना आणि पक्षाच्या संरचनेच्या समजदारीत महत्त्वपूर्ण बदल घडून आले. पक्षाच्या संरचनेवर सर्वप्रथम व्यवस्थितपणे लेनिनने लिहिले आणि सांगितले की कशाप्रकारे कामगार पक्ष भांडवली राज्यसत्तेला भिडण्याची आणि शेवटी तिला उध्वस्त करून समाजवादी समाजाचा पाया रचण्याची क्षमता ठेवतो. लेनिनच्या याच समजदारीवर बोल्शेविक पक्ष 1902 पासून ते 1913 पर्यंत ठोस रूप ग्रहण करत गेला. ज्या तत्त्वांवर हा पक्ष बनला आणि मजबूत झाला, त्यांनाच पुढे जाऊन पक्ष संघटनेची बोल्शेविक तत्त्वे म्हटले गेले. आपण काही मुद्द्यांमध्ये कामगारवर्गाच्या पक्षाच्या मुख्य चारित्रिक गुणवैशिष्ट्यांबद्दल चर्चा करूयात. जसे की पक्षाची विचारधारा काय आहे? पक्षाचे लक्ष्य काय आहे? पक्षाचा कामगार वर्गाशी संबंध कसा आहे? पक्षाचा प्रचार कसा होईल? पक्षाचे स्वरूप आणि त्याची संरचना काय आहे?

आज विघटनाच्या आणि निराशेच्या काळात अनेक अराजकतावादी संघाधिपत्यवादी संघटना आणि अक्षविहीन बुद्धिजीवी सोवियत रशिया आणि समाजवादी चीनमध्ये समाजवादाच्या पतनाकरिता पक्षाच्या संकल्पनेलाच जबाबदार ठरवतात. तर दुसरीकडे सर्व दुरुस्तीवादी पक्ष आपल्या मूळ चरित्रात बुर्झ्वा पक्ष असतात पण स्वत:ला कामगार वर्गासमोर कामगार वर्गाच्या पक्षाच्या रूपात प्रस्तुत करतात आणि कामगार वर्गाला भरकटवतात. ही दोन्ही टोकं पक्षाच्या लेनिनवादी संकल्पनेला बदनाम करतात. त्यामुळेच लेनिनवादी पक्षाच्या संकल्पनेच्या पायाभूत पैलूंना समजणे गरजेचे आहे.

## कामगार वर्गाचा पक्ष हा कामगार वर्गाचे अग्रदल असतो

कामगार वर्गाचा पक्ष हा कामगार वर्गाचे अग्रदल असतो. हा कामगार वर्गाला नेतृत्व देतो. तो वर्ग संघर्षाला उत्पादितही करतो आणि दुसरीकडे त्याला संचालित करण्याचे उपकरणही असतो. अग्रदल असण्याचा अर्थ आहे कामगार वर्गाच्या पुढारलेल्या हिश्श्यांद्वारे कामगार वर्गाला नेतृत्व देणे. पक्षाचे वर्गचरित्र सर्वहारा असते. खुद्द लेनिनच्या शब्दांमध्ये, पक्ष कामगार वर्गाच्या पुढारलेल्या तत्त्वांना आत्मसात करतो आणि कामगार वर्गाचे अग्रदल असतो.

प्रत्येक वर्गाचे मुख्यत: तीन हिस्से असतात: पुढारलेला हिस्सा, मध्यवर्ती हिस्सा आणि पिछाडलेला हिस्सा. कामगार वर्ग सुद्धा प्रस्थापित भांडवलि समाजात भांडवलदार वर्गाने थोपवलेल्या आपसातील स्पर्धेमुळे भांडवली आणि निम्न-भांडवली विचारधारांना बळी पडतो; प्रादेशिक, भाषिक, जातीय, लिंगभेदात्मक कारणांमुळे एका वर्ग-समाजात आपसातील अंतर्विरोध असतात; व्यवसायगत आणि क्षेत्रगत फरकांमुळे, कुशल आणि अकुशल श्रमातील फरकामुळे, मानसिक आणि शारीरिक श्रमातील फरकामुळे आणि याचप्रकारच्या इतर आंतरवैयक्तिक असमानतांमुळे कामगार वर्ग सुद्धा अनेक पातळ्यांवर विभागलेला असतो. विविध कारकांच्या मिश्र प्रभावामुळे प्रत्येकच जागी कामगार वर्गाचे काही पुढारलेले घटक असतात जे पुढारलेली राजकीय चेतना बाळगतात, फक्त वेतन-भत्त्यांच्या लढाईत जे संतुष्ट नसतात, ते फक्त एका मालकाला नाही तर संपूर्ण मालकवर्गाला आणि त्या वर्गाच्या भांडवली सत्तेला शत्रू म्हणून पाहतात. त्यानंतरचा हिस्सा मध्यवर्ती तत्वांचा असतो जो याप्रकार्च्या राजकीय चेतनेला तुलनेने वेगाने कमावण्याची क्षमता आणि समृद्ध-शक्यता बाळगतो. शेवटी पिछाडलेला हिस्सा असतो ज्यामध्ये राजकीय चेतनेचा अभाव असतो, आणि त्याला राजकीय वर्गचेतना मिळवण्यात तुलनेने अधिक वेळ लागतो. कामगार वर्गाचा पक्ष वास्तवात कामगार वर्गाच्या अग्रणी तत्वांना आत्मसात करतो आणि हा अग्रदल-पक्ष कामगार वर्गाच्या तुलनेने पिछाडलेल्या तत्वांना नेतृत्व देतो, त्यांच्या राजकीय चेतनेला उन्नत करतो, त्यांचे राजकीय आणि विचारधारात्मक शिक्षण करतो आणि त्यांच्या दैनंदिन संघर्षांमध्ये त्यांना नेतृत्व देतो, आणि याच प्रक्रियेमध्ये त्यांना भांडवलशाही-विरोधी बनवतो आणि सोबतच त्यांना समाजवादाच्या गरजेवर सहमत करतो, त्यांना समाजवादी कार्यक्रमाचा पाठिराखा बनवतो. याशिवाय, कामगार वर्गाचा पक्ष संपूर्ण कामकरी जनसमुदायांच्या विविध वर्गांसोबत मिळून कामगार वर्गाचा मोर्चा बनवतो आणि त्या मोर्चाचे नेतृत्व करन्यात कामगार वर्गाला सक्षम बनवतो.

कामगारांचे महान नेते मार्क्स यांनी म्हटले होते की कम्युनिस्ट कामगार वर्गाच्या तात्कालिक नाही तर दूरगामी आणि फक्त एक प्रदेश किंवा एका राष्ट्राच्या कामगारांचे नाही तर संपूर्ण देशातील आणि संपूर्ण दुनियेतील कामगारांच्या हितांचे प्रतिनिधित्व करतात. परंतु कम्युनिस्ट पक्ष एकटा क्रांती करत नाही आणि ना कामगार वर्ग एकटा क्रांती करतो. कम्युनिस्ट पक्ष कामगार वर्गाच्या सर्वात पुढारलेल्या तत्वांची फळी असतो, आणि त्यांद्वारेच तो संपूर्ण कामगार वर्ग आणि सामान्य कामकारी जनतेचे नेतृत्व करतो. त्याची शक्ती सामान्य कामकरी जनताच असते. सामान्य कामकरी जनतेचे नेतृत्व कामगार वर्ग करतो. हे लक्षात ठेवले पाहिजे की कामगार वर्ग एकटा इतिहास रचत नाही, तर जनता इतिहास रचते. सामान्य जनतेमध्ये (जिच्यामध्ये आजच्या काळात कामगार वर्ग, गरीब आणि मध्यम शेतकरी, शहरी आणि ग्रामीण निम्न मध्यमवर्ग सामील आहेत) भांडवलदारवर्ग आपल्या विचारधारेचा आणि राजकारणाचा दबदबा स्थापित करून, तिला कामगारवर्गापासून विभक्त करण्यासाठी सतत प्रयत्नरत असतो आणि जनसमुदायांना तो कामगारवर्गाच्या त्या शक्तीपासून वंचित करतो जिचा वापर करून ते भांडवली राज्यसत्तेला

पान 13 वर

# कामगार वर्गाचा राजकीय पक्ष कसा असावा?

पान 12 वरून

उखडून टाकू शकतील. हे तो याकरिता करतो की त्याचे अधिनायकत्व (तानाशाही) म्हणजेच भांडवली राज्यसत्ता टिकवली जावी. कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वामध्ये कामगार वर्ग सामान्य जनतेमध्ये आपली विचारधारा आणि राजकारण स्थापित करून त्यांना भांडवलशाहीच्या वास्तवाशी परिचित करवण्यासाठी आणि त्यांना भांडवलशाही विरोधात संघटित करण्यासाठी संघर्ष करतो. जनतेमध्ये ज्या वर्गाची विचारधारा आणि राजकारण शेवटी प्रभुत्व स्थापित करते, तोच वर्ग या संघर्षामध्ये विजयी होतो. कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्गामध्ये राजकीय संघर्षाचा खरा मुद्दा हाच असतो.

जनता स्वत:हून सुद्धा भांडवलशाही विरोधात बेरोजगारी, गरिबी, इत्यादीमुळे त्रस्त होऊन मधूनमधून विद्रोह करू शकते, परंतु जर त्यांमध्ये कामगारवर्गाची विचारधारा, रणनिती, आणि नेतृत्वाचे प्रभुत्व नसेल , तर ती भांडवली व्यवस्थेला बदलू शकत नाही. तिला आपले राजकारण आणि विचारधारेच्या वर्चस्वाला जनसमुदायांमध्ये स्थापित करून जनसमुदायांच्या शक्तीला भांडवली व्यवस्थेविरोधात वळवावे लागते. त्यामुळेच कामगार वर्ग आपल्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वामध्ये जनसमुदायांमध्ये क्रांतिकारी जनदिशा लागू करतो, जनतेमधील अविकसित, विखुरलेल्या आणि अपुऱ्या योग्य विचारांना तो एकत्र करतो, त्यांना मार्क्सवादी विज्ञान आणि तत्वांच्या उजेडात विकसित करतो, त्यांना केंद्रित करतो आणि त्यांना पूर्ण बनवतो, आणि याच पक्रियेमध्ये तो आपल्या सर्वहारा राजकीय कार्यदिशेला विकसित करतो आणि नंतर या राजकीय कार्यदिशेद्वारे (लाईनद्वारे) तो जनसमुदायांना नेतृत्व देतो. ही एक निरंतर चालत राहणारी प्रक्रिया आहे.

याचप्रकारे कम्युनिस्ट पक्ष कामगार वर्गाचे अग्रदल बनण्यासोबतच संपूर्ण कामकरी जनतेचे क्रांतिकारी केंद्र किंवा कोअर बनत जातो आणि फक्त तेव्हाच तो भांडवली व्यवस्था आणि तिच्या राज्यसत्ते विरोधात समाजवादी क्रांती करू शकतो.

कम्युनिस्ट खाजगी संपत्ती नामशेष करू पाहतात. ते भांडवलाचे रूप घेतलेल्या उत्पादन साधनांचे सामाजीकरण करून या उद्दिष्टाला साध्य करतात. या ऐतिहासिक लक्ष्याला निदर्शनास आणून देण्याचे काम कार्ल मार्क्स आणि त्यांचे साथीदार फ्रेडरिक एंगल्स यांनी केले. त्यांनी वैज्ञानिक समाजवादाच्या सिद्धांताची रचना केली आणि हे सांगितले की इतिहासच्या विकासक्रमात समाजवादी व्यवस्थेची स्थापना कोणाच्या सदिच्छेचा मुद्दा नसून इतिहासाचा पुढचा टप्पा आहे. त्यांनीच सांगितले की भांडवलदार वर्ग सर्वहारा वर्गाला लुटतो ज्याचा आधार वरकड मूल्य आहे. त्यांनी वरकड मूल्याची संकल्पना स्पष्ट करत भांडवली शोषणाच्या घृणीत आणि क्षुद्र रहस्याला भेदले आणि सांगितले की कामगार आपल्या कार्यदिवसाचा फक्त एक छोटा काळच स्वत:साठी काम करतो आणि आपल्या मजुरीच्या समान मूल्य निर्माण करतो, आणि बाकी हिश्श्यामध्ये तो भांडवलदारासाठी अतिरिक्त मूल्य किंवा वरकड मूल्य निर्माण करतो. मजुरी म्हणजे बाकी काही नाही तर मजूराच्या काम करण्याच्या शक्तीचे म्हणजे श्रमशक्तीच्या मूल्याचेच एक बदललेले रूप असते. म्हणजे मजुराला काम करण्याच्या बदल्यात फक्त जगण्यापुरता खुराक मिळतो आणि बाकी वेळ तो भांडवलदारासाठी मोफत नफा निर्माण करतो आणि हाच भांडवलदार वर्गाच्या नफ्याचा स्त्रोत असतो. मार्क्स आणि एंगल्सने संपूर्ण मानव समाजाच्या गतीच्या विज्ञानाच्या रुपामध्ये ऐतिहासिक भौतिकवाद आणि सर्वहारा वर्गाच्या तत्वज्ञानाच्या रुपामध्ये द्वंद्वात्मक भौतिकवादाला स्थापित केले, जो सामाजिक व्यवहाराच्या सर्व अनुभवांचा आणि सोबतच निसर्ग विज्ञानातील शोधांच्या समाहाराच्या आधारावर काढलेला एक विश्व-दृष्टीकोन आहे, म्हणजेच जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन. द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या मते इहलोक, म्हणजेच आजूबाजूचे सगळे भौतिक यथार्थच अस्तित्वात आहे, तेच वास्तव आहे, आणि सतत आपल्या आतील अंतर्गत अंतर्विरोधांमुळे बदलत राहते. मार्क्स आणि एंगल्सच्या या एकंदरीत पायाभूत शिकवणीलाच मार्क्सवाद म्हणतात.

मार्क्सवाद कर्मांचे मार्गदर्शक विज्ञान आहे जे सामाजिक व्यवहार आणि त्याच्या अनुभवांच्या सततचे सामान्यीकरण आणि नंतर त्याच्या परिणामांच्या आधारावर उन्नत सामाजिक व्यवहाराच्या सतत प्रक्रियेमध्ये अधिकाधिक ऊंची गाठत जाते.

लेनिनने एकीकडे कामगार वर्गाच्या अग्रदल असलेल्या पक्षाची संकल्पना प्रस्तुत केली, आणि दुसरीकडे साम्राज्यवादाच्या काळात मार्क्सवादी विज्ञानाला पुढे नेले. यासोबतच माओंनी क्रांतिकारी जनदिशेची संकल्पना आणि समाजवादी संक्रमणाच्या काळाच्या समजदारीला महान सर्वहारा सांस्कृतिक क्रांतीच्या तत्वांच्या रुपात प्रस्तुत केले.

कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी तत्वज्ञान आणि विज्ञानाच्या प्रकाशात कामगार वर्गाला त्याच्या ऐतिहासिक लक्ष्याचा परिचय करवतो, त्याला जागृत, एकजूट आणि संघटित करतो. लेनिनने म्हटले आहे की कम्युनिस्ट पक्ष क्रांतिकारी मार्क्सवादाची कार्यशील शाळा असते. कामगार वर्गाचे अग्रदल या नात्याने पक्षाचे काम या ऐतिहासिक उद्दिष्टाच्या प्राप्तीच्या संघर्षात कामगारवर्ग आणि समस्त कामकरी जनतेला नेतृत्व देणे असते. भांडवल आणि श्रमाच्या ऐतिहासिक महासमरात श्रमाच्या शिबिराच्या सेनापतीची जबाबदारी कामगार वर्गाचा पक्ष पार पाडतो. त्याचे पहिले उद्दिष्ट भांडवली राज्यसत्तेला उखडून फेकून तिच्या जागी कामगारवर्गाची हुकूमशाही स्थापित करणे आहे, म्हणजेच एक समाजवादी राज्य स्थापित करणे. समाजवादी व्यवस्था आणि राज्यसत्तेच्या स्थापनेनंतर कामगार वर्गाच्या अग्रदलाचे काम आहे कामगार वर्गाच्या राज्यकारभारामध्ये चालू असलेल्या वर्ग संघर्षामध्ये कामगारवर्ग आणि जनसमुदायांना नेतृत्व देत बुर्ज्वा वर्गाचा प्रतिकार मोडून काढणे, भांडवली विचारधारेचे वर्चस्व तोडणे, आणि याच प्रक्रियेमध्ये मानसिक श्रम व शारीरिक श्रम, शहर व गाव आणि उद्योग व शेतीमधील फरक संपवत माल उत्पादनाच्या व्यवस्थेलाच नष्ट करणे आणि साम्यवादाकडे(कम्युनिझम), म्हणजे एका वर्गविहीन समाजाकडे वाटचाल करणे. दुरुस्तीवादी पक्ष सर्वात अगोदर मार्क्सवादाच्या मूळावरच हल्ला करतात. बर्नस्टीन, कौट्स्की,ट्रॉट्स्की, ख्रुश्चेव पासून ते डेंग झियाओ पिंग यांनी मार्क्सवादी विज्ञानावर हल्ले केले. दुरुस्तीवादी पक्ष फक्त कम्युनिस्ट पक्ष असल्याचे आवरण ओढून बसलेले असतात, परंतु त्यांचा गाभा मात्र भांडवली पक्षाचा झालेला असतो.

कामगार वर्गाला नेतृत्व देण्याचा अर्थ आहे त्यांना विचारधारात्मक, राजकीय आणि आर्थिक संघर्षांमध्ये नेतृत्व देणे. हे अत्यंत महत्वाचे आहे कारण कामगार वर्गाचा पक्ष कामगार वर्गाला स्वत:स्फूर्ततावादाच्या तावडीत सोडत नाही. कामगार वर्ग फक्त आर्थिक मुद्यांवर संघर्ष करत स्वत:हून क्रांतिकारी चेतना विकसित करत नाही. कामगारांमध्ये क्रांतिकारी राजकारण घेऊन जाण्याचे काम पक्षाचे असते. राज्यसत्तेचा प्रश्न आणि समाजवादाच्या संकल्पनेची समज कामगार वर्ग फक्त आर्थिक मुद्यांवर लढून मिळवू शकत नाही. कामगार वर्गाचे ऐतिहासिक लक्ष्य आणि त्याच्या नेतृत्वकारी भुमिकेबद्दल पक्षच त्याला अवगत करवतो—पक्ष, जो स्वत:च कामगार वर्गाच्या अग्रणी तत्वांना सामावून घेणारी संघटना आहे. कामगार वर्गाची स्वत:स्फूर्त चेतना ट्रेड युनियनवादी राजकारणाऱ्या मर्यादेपर्यंतच घेऊन जाते. आज संपूर्ण भारतात केंद्रिय ट्रेड युनियन्स अर्थवादाच्या चौकटीतच कामगार वर्गाला अडकवून ठेवतात. देशाच्या मोठ्या औद्योगिक शहरांमध्ये दुरुस्तीवादी पक्षांच्या ट्रेड युनियन्स कामगारांना वेतन-भत्त्याच्या लढाईत अडकवून ठेवतात. बँक कर्मचारी, रेल्वे कर्मचारी आणि सर्व नियमित कामगारांच्या युनियन्स कामगारांमध्ये एका युनियन नोकरशाहीला निर्माण करतात ज्या ह्या व्यवस्थेतच आपला स्वर्ग शोधत बसतात. असंघटित कामगारांमध्ये सुद्धा ज्या युनियन्सचा प्रभाव आहे त्यांपैकी अधिकांश फक्त फॅक्टरी मालकांची आणि सरकारी श्रम विभागाची दलाली करतात. अशामध्ये कामगारांमध्ये आपण राजकीय प्रचार घेऊन जाण्याची गरज आहे. कामगारांना आर्थिक संघर्षांमध्ये पक्ष नेतृत्व देतो परंतु याद्वारे एकता बनवून कामगारांमध्ये राजकीय प्रचाराचा आधार तयार करतो आणि या आर्थिक संघर्षांना राजकीयरित्या लढतो. म्हणजेच आपल्या आर्थिक मागण्यांकरिता लढतानाच तो कामगार वर्गाला या आर्थिक समस्यांच्या मूळ कारणाशी अवगत करवतो आणि त्यांना त्यांच्या दीर्घकालिक उद्दिष्टाबद्दलही शिक्षित करतो. समाजवादी चेतनेचा प्रवेश 'बाहेरून' होतो याचा अर्थ आहे की स्वत:हून आर्थिक संघर्षांमधून समाजवादी चेतना निर्माण होऊ शकत नाही आणि सुरूवातीच्या काळात या चेतनेला कामगार आंदोलनामध्ये घेऊन जाणारा समूह अनेकदा क्रांतिकारी बुद्धिजीवींचा असतो. याचा अर्थ हा नाही की कामगार स्वत: क्रांतिकारी बुद्धिजीवींची भुमिका निभावू शकत नाहीत. परंतु लेनिनच्या शब्दांमध्ये जेव्हा ते या भुमिकेला निभावतात, तेव्हा ते एक सामान्य कामगाराच्या नाही तर एका समाजवादी बुद्धिजीचीच्या भुमिकेत असतात. सर्वहारा विचारधारेला कामगार वर्गापर्यंत आणि सामान्य कामकरी जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम सर्वहारा वर्गाचा पक्ष करतो.

आज कामगार वर्गासमोर ऐतिहासिकरित्या दोन नवे कार्यभार सुद्धा आहेत. आपण ज्या काळात जगत आहोत, तिथे कामगार वर्गीय क्रांत्यांचे पहिले ऐतिहासिक कालचक्र पूर्ण झाले आहे. आपण कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्गामधील वर्गसंघर्षाच्या दुसऱ्या आणि निर्णायक वर्गसंघर्षाच्या महासमराच्या सुरूवातीच्या पहिल्या टप्प्यात आहोत. अशावेळी आपल्याला कामगार वर्गाला त्याच्या भूतकाळातील संघर्षांशी परिचित करवण्याच्या सर्वहारा पुनर्जागरणाच्या कार्यभारालाही हाती घ्यावे लागेल. हे काम क्रांतिकारी कामगार पक्षच करू शकतो. त्याचवेळी दुसरीकडे आपल्याला बदललेल्या परिस्थितींमध्ये क्रांतीच्या विज्ञानाला लागू करावे लागेल कारण आजची भांडवलशाही हुबेहूब लेनिन वा माओच्या काळातील भांडवलशाही नाही, तर तिच्यातही अनेक परिवर्तने झाली आहेत, ज्यांना मार्क्सवादी विज्ञानाच्या प्रकाशात समजून घ्यावे लागेल. हा सर्वहारा प्रबोधनाचा कार्यभार बनतो. सर्वहारा पुनर्जागरण आणि सर्वहारा प्रबोधनाच्या कार्यभाराला, सध्याच्या काळात, फक्त कामगार वर्गाचा क्रांतिकारी पक्षच पूर्ण करू शकतो.

अनुवाद: अभिजित

(अपूर्ण, पुढील अंकात सुरू राहील).

# पंजाबमध्ये केजरीवाल आणि चन्नीमध्ये 'आम आदमी' बनण्याकरिता चालू आहे हास्यास्पद स्पर्धा!

पान 7 वरून

महिन्यातच अयोध्येला जाण्याकरिता मोफत रेल्वे सेवा चालू केली आहे. 2019 मध्ये केंद्र सरकारने पास केलेल्या राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही (एन.आर.सी.) आणि नागरिकता दुरुस्ती कायद्या (सी.ए.ए.) विरोधात ठराव पास करण्यात सर्वाधिक उशिर केजरीवाल सरकारनेच केला होता. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही की केजरीवाल हा भाजपचाच छोटा भाऊ आहे.

काँग्रेस आणि आम आदमी पक्षाला निवडणुकांकरिता वेगवेगळ्या उद्योगपती, धंदेबाज, फॅक्टरी मालक, धनिक शेतकऱ्यांकडून तर निधी मिळतोच, वरून यांच्या नेत्यांचे आणि मंत्र्यांचे खिसेही नेहमीच गरम असतात. 2017 च्या निवडणुकांमध्ये चरणजीत सिंह चन्नीने 14 कोटींची संपत्ती घोषित केली होती. याच निवडणुकांमध्ये पंजाब काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नवजोत सिंह सिद्धूंची एकूण घोषित संपती 45 कोटींपेक्षा जास्त होती. आम आदमी पक्षाचे संगरूर मधून निवडून आलेले खासदार भगवंत मन यांची घोषित संपत्ती 1.2 कोटी रूपये होती आणि अरविंद केजरीवाल यांनी जवळपास साडे तीन कोटी रुपयांची संपत्ती घोषित केली होती. यांना 'सामान्य माणूस' म्हणणे म्हणजे दिवसरात्र एक करून जीवन चालवणाऱ्या कोट्यवधी कामगार-कष्टकऱ्यांसोबत एक क्रूर थट्टा ठरेल.

या सर्व गोष्टींवरून हे तर स्पष्ट होते की ना हे दोन्ही पक्ष 'सामान्य' आहेत आणि ना यांचे नेते-मंत्री 'सामान्य माणूस'. हे दोन्ही पक्ष 'खास' आहेत आणि 'खास वर्गा'च्या हितांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्यासाठीच सर्व नियम-कायदे बनवतात. कामगार-कष्टकरी जनतेने हे समजले पाहिजे की सत्तेत कोणीही असो, कोणत्याही भांडवल्या पक्षाचे सरकार येवो, आपल्या जीवनात कोणताही विशेष फरक पडणार नाहीये. शिक्षण, आरोग्य, रोजगार अशा मागण्यांभोवती संघटित होऊन जर आपण आपला पक्ष स्वत:च उभा करत नाही, तोपर्यंत देशातील कामकरी लोक बरबादच होत राहतील.

# अयोध्येत राम मंदिराच्या नावाने जमीन घोटाळा

✍ अभय

'मुंह मे राम, बगल मे छुरी' अशी हिंदीमध्ये म्हण आहे. तिचा अर्थ आहे की तोंडात राम नावाचे, पण इरादे मात्र धोका देण्याचे. सध्या सत्तेत असलेले संघी फॅसिस्ट या म्हणीचे मूर्तीमंत प्रतिक आहेत. रामाचे नाव घेऊन, राम मंदिर बांधण्याचे राजकारण करत ज्यांनी देशात धार्मिक विद्वेष पसरवला, दंगली घडवल्या, कामगार-कष्टकऱ्यांची माथी भडकावून स्वत: मात्र सत्तासोपानापर्यंत पोहोचले, त्या मोदी-योगींच्या राज्यामध्ये अयोध्येत राम मंदिराच्या नावाने या भक्तांनी प्रचंड मोठा जमीन घोटाळा चालवला आहे आणि भाजप व संघाचे मोठमोठे पदाधिकारी त्यात सामील आहेत.

या मंडळींनी राम मंदिराच्या ट्रस्टच्या नावाने स्वस्तात जमिनी घेऊन त्या गडगंज भावाने विकण्याचा जमिन घोटाळा चालवला आहे. अयोध्येत राम मंदिर ट्रस्ट वेगवेगळ्या बांधकामांसाठी जमिनी घेत आहे. यातच मागच्या वर्षी मोदी ने भूमिपूजन केल्यापासून जमिनींच्या किमतीमध्ये अमाप वाढ झालेली आहे. त्याचे कारण हेच की आता अयोध्येच्या भव्य राममंदिराभोवती भले मोठे पर्यटन व्यवसाय उभे राहणार असताना त्यात आपला वाटा निश्चित करण्यासाठी जमिनींचे व्यवहार करणारे दलाल, छोटे मोठे पर्यटन व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक सरसावत आहेत. जमिनींच्या उलाढाली होताहेत.

नुकत्याच समोर आलेल्या एका घोटाळ्यानुसार, अशाच एका व्यवहारामध्ये एका जमिनीच्या दोन भागांचे वेगवेगळे व्यवहार झाले, ज्यात आधी 10,000 स्क्वेअर फुट जमीन एका व्यक्तीने राम मंदिर ट्रस्टला 8 कोटी रुपयांसाठी विकली, आणि त्याच जमिनीचा दुसरा 2,000 स्क्वेअर फुट भाग त्या व्यक्तीने रवी मोहन तिवारी याला दोन कोटींसाठी विकला. आश्चर्याची बाब म्हणजे या व्यवहाराच्या एकोणीस मिनिटानंतर तोच जमिनीचा भाग तिवारी ने 18.5 कोटी रुपयात राम मंदिर ट्रस्ट च्या नावावर केला. म्हणजे एकोणीस मिनिटात दोन कोटींचे साडे-अठरा कोटी झाले. या दोन्ही व्यवहारांमध्ये साक्षीदार म्हणून सध्या असलेले अयोध्येचे महापौर, भा.ज.प. व संघाचे पदाधिकारी आणि मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या आहेत.

दुसरी घटना. 'मांझा बरेहाटा' नावाचे अयोध्येच्या अगदी जवळ एक गाव आहे. इथे 1992 मध्ये काही भगवा वेषधारी मंडळी 'महर्षी रामायण विद्यार्थी ट्रस्ट' या नावाने आले होते ज्यांनी गावातील शेतकऱ्यांना आश्वासन दिले की जर त्यांनी ट्रस्टला जमिनी विकल्या तर महर्षी रामायण विद्यार्थी ट्रस्ट येत्या काळात या जमिनींवर दवाखाने, शाळा-महाविद्यालये बांधेल. या आश्वासनाच्या जिवावर शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी ट्रस्टला विकल्या. आता उत्तरप्रदेशातील कायद्यानुसार एखादी जमिन जर एस.सी. व्यक्तीकडे असेल तर तिचे व्यवहार फक्त ईतर एस.सी. कॅटेगरीत लोकांशी होऊ शकतात. या 'रामभक्त' लोकांनी एस.सी. व्यक्तीची जमिन हडपून ट्रस्टच्या नावे करायला बाहेरगावाहून बोलावलेल्या रोंघई नावाच्या एका एस.सी. व्यक्तीला हाताशी धरले. त्यांनी अगोदर सर्व एस.सी. व्यक्तींच्या जमिनी रोंघईच्या नावावर करवल्या आणि मग त्याने या जमिनी ट्रस्टला दान केल्या असे दाखवले. रोंघईने 1 लाखाला विकलेल्या विकलेल्या या जमिनींची किंमत आज 4 ते 9 कोटी रुपये आहे. अशा प्रकारे अयोध्येला अगदी लागून असलेल्या या गावातील बऱ्याच जमिनी हळूहळू महर्षी रामायण विद्यार्थी ट्रस्टच्या नावे झाल्या. पुढे ट्रस्टच्या ज्या जमिनींवर जे शेतकरी शेती करायचे त्यांना तिथेच ट्रस्टने शेती करू दिली. परंतु मग आता जसा राम मंदिराचा निकाल लागला तशा या जमिनीसंबंधात हालचाली सुरू झाल्या. झपाट्याने जमिनींचे भाग अधिकाऱ्यांच्या, नेत्यांच्या, आमदार खासदारांच्या, स्थानिक हिंदुत्ववाद्यांच्या, पोलिस अधिकाऱ्यांच्या नावे होताना दिसत आहेत व त्या जमिनींना कुंपणं घातली जात आहेत, त्या जमिनींभोवती भिंती बांधून त्या बंद केल्या जात आहेत. अनेक खरेदी व्यवहारांमध्ये समोर आले आहे की स्थानिक आमदार, नोकरशहा, अधिकाऱ्यांचे नातेवाईक, रिव्हेन्यू अधिकारी, राज्य माहिती अधिकारी, पोलिस अधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या थोडे अगोदर आणि नंतर मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी केल्या आहेत. उदाहरणार्थ अयोध्येचे विभागीय आयुक्त एम.पी.अग्रवाल यांच्या सासऱ्याने, अयोध्येचे महसूल अधिकार पुरुषोत्तम दास गुप्तांचे एक नातेवाईक, गोसाईगंजचे आमदार इंद्र प्रताप तिवारी, पोलिस डेप्युटी इंसपेक्टर जनरल दिपक कुमार यांची मेव्हणी, माजी आय.ए.एस. अधिकारी उमाधर द्विवेदी, इत्यादींची नावे समोर आली आहेत. याशिवाय इतरही व्यावसायिकांशी आता या ट्रस्टने करायला सुरुवात केली आहे. लक्ष देण्याची गोष्ट ही आहे की या सगळ्याची सुरुवात 1992 पासूनच झालेली आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर एका स्थानिक न्यायालयाने हे व्यवहार बेकायदेशीर ठरवत जमीन सरकारजमा करण्यास सांगितले आहे.

घोटाळे बाहेर आल्यानंतर आरोप करणार सर्वच 'राम विरोधक' आहेत आणि असा काही घोटाळा झालाच नाही असा प्रचार भाजप-संघाने चालू केला आहे आणि चौकशीचे नाटक करून स्वत:च्या सरकारलाच 'क्लिन चीट' देण्याचा सोपस्कारही निभावत आहे. भाजपने काँग्रेसवर आरोप चालू केले आहेत की अगोदर प्रियांका गांधींनी त्यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांच्या जमिन घोटाळ्यांची चौकशी करवावी. आम्ही आपल्यास आठवण करून देऊ इच्छितो की रॉबर्ट वाड्रांविरोधात कारवाई करण्याचे आश्वासन देत भाजप सत्तेवर आली होती, मग सत्तेत आल्यावर त्यांनी कारवाई का केली नसावी? वरवर भांडणाऱ्या या सर्व भांडवली पक्षांच्या नेत्यांचे एकमेकांसोबत धंद्यावे व्यवहार असतात हे आता सर्वज्ञात आहे. खरेतर 'भूखंडाचे श्रीखंड खाल्ले' असे आरोप ज्यांच्यावर झाले त्या शरद पवारांपासून ते काँग्रेसचे गांधी-वाड्रा, सर्वच भांडवली पक्षांचे नेते आणि भाजपचे मोठमोठे नेते हे सर्वच एकाच माळेचे मणी आहेत आणि सत्तेचा वापर करून जमिनींचे घोटाळे करणे हे सत्ताधाऱ्यांच्या नियमित कामांपैकी एक आहे.

परंतु भाजपवाल्यांचा या बाबतीत ढोंगीपणात कोणी हात धरू शकत नाही. या 'रामाचे' नाव घेऊन राजकारण करणाऱ्यांसाठी, भक्तीला राजकारणाचे हत्यार बनवणाऱ्यांसाठी, 'रामा'च्या नावाने दंगली घडवणाऱ्यांसाठी 'राम' आणि धर्म अजून काही नसून लोकांना एकमेकांची डोकी फोडायला लावून, मागच्या बाजूने स्वत:ची घरं भरण्याचा राजमार्ग आहे! अमित शहांच्या मुलाच्या संपत्तीत हजारो पटींनी वाढ झाली आहे, आणि पंचतारांकित पक्ष कार्यालये उभारून भाजप पक्ष सर्वाधिक श्रीमंत पक्ष बनला आहे तो असाच नाही. आजही सत्ता यांना पाहिजे आहे ती त्यांच्या पाठिराख्या कंपन्या, ठेकेदार, बिल्डर, मालकांना मोठमोठी कंत्राट देऊन अजून श्रीमंत करण्यासाठी! फक्त ऐयाश खाण्यावर आणि दिवसात तिनदा भरजरी कपडे बदलणाऱ्या 'फकिर' प्रधानमंत्री मोदींवर हजारो कोटी रूपये तुमच्या आमच्या घामाच्या कमाईतून केले गेले आहेत! हे विसरू नका की जेव्हा यांनी रथयात्रा काढली होती, तेव्हा सुद्धा हे आलिशान ए.सी. रथात फिरले होते! करोना काळात माणसं मरत असताना, व्हेंटीलेटर मध्ये घोटाळा करणारे हैवान आहेत हे! भाजपचे भांडवलदार मालक आजही त्यांच्यावर खुश आहेत, त्यामुळेच याच्या भ्रष्टाचाराच्या कहाण्या दलाल मीडीयामध्ये अजून येते नाहीत, पण जनता सगळे काही समजत आहे! संभाजी भगताच्या एका गाण्यात म्हटल्याप्रमाणे या लोकांनी 'रथ राम का सजाया भाई, गेम देश का बजाया भाई'!

# आधार आणि मतदार ओळखपत्र जोडून मोदी सरकारची मतदानाच्या लोकशाही अधिकारावर हल्ल्याची पूर्वतयारी

पान 15 वरून

व्यक्तींच्या निजतेला डावलून त्यांची माहिती मिळवणे आणि वैयक्तिक निशाणा बनवून प्रचार करणे अशा गोष्टीही बड्या भांडवली पक्षांना सहज शक्य होतील. याच कारणांमुळे भांडवली लोकशाही व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या परंतु तिच्या भविष्याबद्दल उदारवादी विचार करणाऱ्या 100 च्या वर माजी अधिकाऱ्यांनी सरकारला या योजनेच्या विरोधात पत्र दिले आहे.

इतिहास आणि वर्तमान दोन्ही साक्षी आहेत की तंत्रज्ञानाचा गाजावाजा करून जणू काही जनतेच्या जीवनात स्वर्ग येईल अशाच वल्गना नेहमी केल्या जातात. आधार असो, वा ऑनलाईन पेमेंट यांनी जनतेच्या जीवनात कोणताही मूलभूत बदल घडवलेला नाही, कारण की जनतेचे जीवनमान उंचावेल, चांगला रोजगार मिळेल, मजुरी वाढेल असे यामागे उद्दिष्टच नाही. अशा योजनांमुळे सरकारचे आणि मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे अर्थव्यवस्थेवरचे आणि पर्यायाने जनतेवरचे नियंत्रण मात्र वाढले आहे.

यावरताण म्हणजे खुद्द निवडणुक आयोगानेच स्वत:च्या अधिकारावर घाला घालणाऱ्या या कायद्याचे स्वागत केले आहे, तेव्हा निवडणूक आयोग मोदी सरकारच्या तालावर नाचत आहे हे पुन्हा समोर आले आहे. समर्थन करताना निवडणूक आयोगाने म्हटले आहे की यामुळे "राज्यसत्तेच्या हितांचे संरक्षण" होईल. थोडक्यात तथाकथित "स्वतंत्र" म्हणवल्या जाणाऱ्या निवडणूक आयोगाने मान्य केले आहे की त्याचे काम "सत्तेचे" संरक्षण आहे, नागरिकांच्या लोकशाही हितांच्या संरक्षण नाही. खरेतर भांडवली लोकशाही ही भांडवलदार वर्गाच्या नियंत्रणात चालणारीच व्यवस्था असते, परंतु आता आर्थिक संकट तीव्र होत असताना आणि देशामध्ये असंतोष पसरत असताना देशातील व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याबद्दल देशातील भांडवलदार वर्गाचा आत्मविश्वास डळमळीत होत आहे. त्यामुळेच निवडणकीसारख्या प्रक्रियेवरही ई.व्ही.एम. किंवा आधार लिंकिंग सारख्या तंत्रज्ञानाद्वारे नियंत्रण वाढवण्याबद्दल सर्वसहमती दिसून येते. निवडणूक आयोगाच्या वक्तव्यातून हे समजले पाहिजे की ही दिखाव्याची लोकशाही आणि हिच्या (संसद, सरकार, निवडणुक आयोग, कोर्ट अशा) सर्व संस्था शेवटी जाऊन "राज्यसत्तेचे" म्हणजे भांडवलदार वर्गाच्या प्रभुत्वाचेच रक्षण करतात.

आधार आणि मतदान ओळखपत्र लिंक करून तर लोकशाहीच्या अत्यंत पायाभूत अधिकारावरच घाला घालण्याचे काम केले जाईल. हिंदुत्व फॅसिझमने सत्तेत आल्यापासून आजपर्यंत लोकशाही व्यवस्थेचा सांगाडा तसाच ठेवला असला तरी आतून मात्र भारताच्या लोकशाही व्यवस्थेला पोखरण्याचे व कमकुवत करण्याचे आणि भांडवलदार वर्गाकरिता दमन करण्याचे काम निरंतर केले आहे. निवडून आलेले सत्ताधारी व त्यांना निवडून देणारी वा सत्तेतून काढणारी निवडणूक प्रक्रिया या दोन्हींचे एकमेकांपासून तुलनेने स्वतंत्र व स्वायत्त असणे कुठल्याही लोकशाही व्यवस्थेच्या अस्तित्वाची पूर्वशर्त आहे. मतदान कार्ड व आधार जोडण्याच्या ह्या निर्णयाने लोकशाही प्रक्रियेच्या मुळाशीच मोठा हात घातला आहे. आजवर लोकशाहीचे आवरण पांघरून वास्तवात कत्तली घडवून आणणाऱ्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट लांडग्यांना आता हे कातडे ही जड होऊ लागले आहे असेच दिसते. संपूर्ण निवडणूक प्रकिया जरी अद्याप सरकारच्या पूर्ण नियंत्रणात नसली तरी ह्या कायद्याने निवडणुक प्रकियेमध्ये सत्ताधारांच्या हस्तक्षेपासाठी दार अजून थोडी किलकिली का होईना पण खुली होणार आहेत. ह्यातूनच आपल्या विरोधकांना मतदानापासूनच वंचित ठेवण्यापर्यंत सर्वकाही करण्याच्या शक्यता ह्या फॅसिस्टांसाठी खुल्या होतात. तेव्हा या कायद्याला निकराने विरोध करणे आपले कर्तव्य बनते.

# आधार आणि मतदार ओळखपत्र जोडून मोदी सरकारची मतदानाच्या लोकशाही अधिकारावर हल्ल्याची पूर्वतयारी

✎ नेहा

डिसेंबर 2021 रोजी निवडणुक कायदे (दुरूस्ती) विधेयक, 2021 लोकसभेत मंजूर करण्यात आले. या विधेयकाद्वारे निवडणुक कायद्यांमध्ये चार बदल केले गेले आहेत. त्यातील सर्वात महत्वाचा व मोठा बदल म्हणजे आधारला मतदान ओळखपत्राशी जोडणे हा होता. हे विधेयक कायदेमंत्री किरेन रीजीजू यांनी सोमवारी लोकसभेत सादर केले व अवघ्या 20 मिनिटांमध्ये आवाजी मतदानाने हे विधेयक मंजूर करण्यात आले. दुपारी 2 वाजून 47 मिनिटांनी हे विधेयक सादर झाले आणि 3 वाजून 10 मिनिटांनी ते मंजूर करण्यात आले. एवढा मोठा महत्वाचा निर्णय सरकारने इतक्या गडबडीत का घेतला असावा यावर अनेक प्रश्न उपस्थित झाले. यावर सविस्तर चर्चा होण्याची गरज होती असे विविध पक्ष, संघटनांचे मत होते. हे विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे पाठवले जावे आणि त्याठिकाणी आधारला मतदार ओळखपत्राशी जोडणे हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गोपनीयतेच्या मुलभूत अधिकाराचे उल्लंघन होत नाही का, याचा अभ्यास केला जावा अशी विरोधकांची मागणी होती. पण विरोध झाल्यानंतरही संसदेच्या दोन्ही सभागृहात हे विधेयक मंजूर झाले. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या मते जेव्हा हे विधेयक संसदेच्या एका समितीसमोर होते, तेव्हा अनेकांना या विधेयकाबद्दल सांगितलेच गेले नाही किंवा त्यांच्या परोक्ष हे विधेयक मंजुरीला पाठवले गेले. विरोधकांच्या म्हणण्यात तथ्य असो वा नसो, हे स्पष्ट आहे की भांडवली पक्षाच्या विरोधकांनी या विधेयकाला कोणताही लक्षणीय विरोध केलेलाच नाही आणि एकाप्रकारे मूकसंमती दिली आहे. इतक्या घाईगडबडीत हे विधेयक मंजूर करण्यामागे भाजपच्या फॅसिस्ट सरकारच्या लोकशाहीविरोधी इराद्यांना ओळखणे आवश्यक आहे.

## केंद्र सरकारचा विधेयकामागचा दिखाऊ दावा

केंद्र सरकार असा दावा करत आहे की आधारकार्डला मतदान ओळखपत्राशी जोडल्याने अनेक फायदे होतील. जसे की बनावट मतदान करणाऱ्यांना आळा बसेल, बोगस मतदान कमी होईल, तसेच एखाद्या व्यक्तीची अनेक ठिकाणी मतदार असलेली नोंदणी रद्द करण्यास मदत होईल. त्यांचा असाही तर्क आहे की स्थलांतरीत कामगार काम करण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये जात असतात त्यामुळे त्यांना नेहमीच मतदानाच्या वेळी आपल्या मूळ गावी जाणे शक्य होत नसल्यामुळे ते मतदानापासून वंचित राहतात, आधार कार्डाला मतदान ओळखपत्राशी जोडल्याने स्थलांतरीत कामगार आपले मत कुठुनही करू शकतील यामुळे मतदानाची टक्केवारी वाढण्यात सुद्धा मदत होईल. या सांगितल्या जात असलेल्या दाव्यांचा फोलपणा आणि कायद्यामागचे खरे सत्य समजणे आवश्यक आहे.

## आधार कार्डाची निरर्थकता आणि आधारामुळे झालेले घोटाळे

सर्वप्रथम आधार योजनेची निरर्थकता, तिच्याबद्दलचे सर्व खोटे दावे, आणि त्यामागील सरकारचा खरा इरादा समजला पाहिजे. आधारबद्दल असे सांगितले जात होते की या कार्डामुळे घोटाळ्यांवर आळा बसेल, सरकारच्या अनेक योजनांचे फायदे घेणाऱ्यांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा बसेल. आता तर हे सिद्ध झाले आहे की हे दावे धादांत खोटे होते. उलट आधार चालू झाल्यापासून घोटाळे करणे सोपे झाले आहे, कारण पूर्वी एखाद्या घोटाळ्यासाठी बरीच कागदपत्र बोगस करावी लागत; पण आता एकच आधार कार्ड बोगस केले की बरेच काही साध्य करता येते. अशा पद्धतीचे घोटाळे करणाऱ्या टोळ्यापैकी काही पोलिसांच्या हाती लागतात तर काही सुटतात. खोटी आधारकार्ड असलेल्या अनेक व्यक्ती रोज पकडल्या जातात त्यांच्या बातम्या सतत समोर येत असतात.

हे तर आता उघड झाले आहे की **आधारचा उपयोग जनतेला "आधार" देण्यासाठी नाही तर जनतेवर पाळत ठेवण्यासाठीच आहे.** आधारद्वारे विविध नागरी सुविधा जनतेला दिल्या जातील असे मोठमोठे दावे काँग्रेस-भाजपच्या सरकारांनी केले होते, परंतु वास्तवात शिक्षण, आरोग्य, रेशन, प्रवास, गॅस अशा सुविधा मिळणे लांबच त्या अजून महाग व दुरापास्त झाल्या आहेत. आधारद्वारे खरे काम जे सरकारने साध्य केले आहे ते आहे जनतेच्या सर्व ऑनलाईन माहितीला जोडण्याचे आणि त्याद्वारे व्यक्तींवर पाळत ठेवण्याचे. आज **आधार कार्ड, पॅन कार्ड, मोबाईल फोन नंबर, सर्व बँक खाती, आणि त्याद्वारे मोबाईलवर चालू असलेल्या पेटीएम, फोनपे, गुगलपे सारख्या ॲप्स, तुमची गुगल, फेसबुक सारखी खाती, तसेच गाड्यांवरील फास्टॅग वगैरे एकमेकांना जोडली गेली आहेत.** या सर्व माहितीला बघण्याची सरकारला कायद्याने परवानगी आहे. या माहितीद्वारे तुम्ही कुठे जाता, कोणाशी व्यवहार करता, तुमची मतं काय आहेत अशी सर्व माहिती आता एकत्र सरकार मिळवू शकते आणि व्यक्तीच्या निजतेच्या (खाजगीपणाच्या) सर्व बंधनांना झुगारून व्यक्तींवर नजर ठेवू शकते, व त्यांचे दमन प्रभावीरित्या करू शकते. आधुनिक संगणक प्रोग्राम्समुळे हे काम करणे अतिशय सोपे सुद्धा झाले आहे.




यापुढे जाऊन आधार योजनेचे सर्व इतर दावेही फोल आहेत हे आता सिद्ध झाले आहे. उदाहरणार्थ आधार म्हणजे यु.आय.डी. म्हणजे युनिक आय.डी. म्हणजे अद्वितीय ओळखपत्र असे याचे नाव आहे. प्रत्येक आधार कार्डासोबत त्या व्यक्तीचे बायोमेट्रिक म्हणजे हातांचे ठसे आणि डोळ्यांचा स्कॅन जोडलेला आहे. प्रत्येक व्यक्तीचे बायोमेट्रिक सुद्धा युनिक म्हणजे अद्वितीय असते. तरीही आधार यंत्रांना फक्त बायोमेट्रीक म्हणजे हातांचा ठसा दिला तर तुमचीच माहिती मिळेल याची खात्री सरकार देत नाही! म्हणूनच नेहमी तुमचा आधार नंबर आणि हातांचा ठसा दोन्ही मागितले जातात! यापुढे जाऊन बायोमेट्रीक माहिती देऊनही आधारच्या यंत्रांनी 12 टक्के प्रकरणांमध्ये तुमची ओळख पटवलीच जात नाही असे समोर आले आहे. या अशा प्रकरणांमुळेच आधारद्वारे राशन मिळणे सोडाच, झारखंड मध्ये रद्द झालेल्या 88 टक्के रेशन कार्डांचे कारण आधारद्वारे पडताळणी होऊ न शकणे होते.

## आधार-मतदार ओळखपत्र लिंक करण्यामागचे खरे कारण काय?

राज्यघटनेनुसार निवडणूका घडवणे, मतदार याद्या बनवणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे आणि निवडणूक आयोग हा केंद्र वा राज्य सरकारांपासून स्वतंत्रपणे काम करणे अपेक्षित आहे. आज ही गोष्ट लपून राहिलेली नाही की निवडणूक आयोगाची स्वतंत्रता ही फक्त बोलाची कढी आहे आणि तसे तर नेहमीच परंतु विशेषत: मोदी सरकार सत्तेवर आल्यावर केंद्र सरकारच्या तालावर आयोग चालत आला आहे. प्रस्तुत विधेयकाने मात्र हा दिखावा दूर सारत चक्क मतदार याद्या बनवण्यात सरकारी हस्तक्षेपाला रस्ता मोकळा केला आहे. ते कसे? आधारची जबाबदारी केंद्र सरकारकडे आहे आणि आधार व मतदार ओळखपत्र लिंक केल्यावर पडताळणीचे काम केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय शक्य नाही. आधार देणारी संस्था निवडणुक आयोगाला जबाबदार नाही! तेव्हा आधारच्या माहितीशी खेळून अनेकांना मतदार यादीतून वगळण्याची शक्यता खुली होते आणि निवडणुक आयोगाचे तथाकथित स्वातंत्र्यही धुळीस मिळते. आधारचे काम सरकारने खाजगी यंत्रणेमार्फत करवले आहे आणि मतदार ओळखपत्राचे काम सरकारी कर्मचाऱ्यांकडून निवडणूक आयोग करवून घेत होता, तेव्हा आता मतदार याद्यांमध्ये खाजगी क्षेत्राच्या हस्तक्षेपालाही मुभा मिळते.

ही फक्त शक्यता नाही, तर असे प्रत्यक्षात घडले आहे! 2015 साली आधार आणि मतदार ओळखपत्र लिंकिंगची कल्पना निवडणुक आयोगाकडूनच समोर आणवली गेली आणि त्यावर कामही लगेच चालू केले गेले. या विरोधात काही जणांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि सर्वोच्च न्यायालयाने त्याला स्थगिती दिली. परंतु थोडे नुकसान होऊन गेले होते. या कारवाईच्या परिणामी 2018 च्या तेलंगणा आणि आंध्र विधानसभा निवडणुकांमध्ये अंदाजे 30 आणि 20 लाख लोकांची नावे मतदार यादीतून वगळली गेली. पॉंडेचरी मध्ये सुद्धा याच प्रकारे लाखो नावे मतदार यादीतून वगळली गेली.

**खालील प्रकारे तुमच्या मतदान अधिकारावर गदा येऊ शकते:** तुमचा आधार आणि मतदार ओळखपत्र वरचा पत्ता न जुळणे, वा जन्मतारीख वा फोटो वा नावाचे स्पेलिंग वा लिंग ना जुळणे, किंवा तुमचे बायोमेट्रीक आधारद्वारे न पडताळले जाणे. आधार आणि मतदार ओळखपत्र या दोन्ही "ओळखपत्रा"मध्ये कोट्यवधी चूका आहेत आणि त्या सरकारच्या गलथानपणामुळेच आहेत हे जगजाहीर आहे. थोडक्यात अशा प्रकारच्या माहितीच्या आधारावर अनेकांना मतदान अधिकार नाकारणे सरकारला शक्य होऊ शकते. याशिवाय असे कोट्यवधी नागरिक आहेत ज्यांच्याकडे आधार नाही, असे नागरिकही मतदार यादीतून वगळले जाणार. सरकारचे म्हणणे आहे की हे 'लिंकिंग' स्वैच्छिक असेल, परंतु **आधार योजनाच 'स्वैच्छिक' आहे असे म्हणून तिची सक्ती कशी केली गेली हे सर्वांना माहित आहे.** निवडणुकीत निवडणुक अधिकाऱ्यांना ओळख पटवण्यासाठी आधार कार्ड न दाखवण्याची मूभा कायद्याने जवळपास काढून घेतली आहे, तेव्हा आधार व मतदान कार्ड न जुळल्यास मतदानाचा अधिकार धोक्यात येण्याची प्रचंड मोठी शक्यता आहे. वयोमानानुसार व विशेषत: शारीरिक कष्टाच्या कामानुसार हातांचे ठसे बदलणे आणि बायोमेट्रिक न जुळणे सुद्धा होत असते. असे लोकही धोक्यात येतात. मतदानाच्या वेळी जर बायोमेट्रीक वापरले तर फक्त मतदान अधिकार नाकारला जाण्याचीच नाही, तर तुमच्यावर तोतयेगिरी केल्याचा खोटा गुन्हाही दाखल होण्याची शक्यता खुली होते! आधारच्या डेटाबेस सोबत खेळून एका क्लिकने करोडो लोकांची माहिती अनुपलब्ध केली जाऊ शकते आणि ऐन निवडणुकीत मतदान अधिकार नाकारला जाऊ शकतो. लिंकींग केल्यावर पडताळणी कशाच्या आधारावर होईल याबद्दलही सरकार चुप्प आहे. तेव्हा इथे उल्लेखलेल्या क्लुंप्तीपलिकडेही अनेक क्लुप्त्या लढवून सरकार मतदान अधिकार नाकारण्याचे काम करू शकते.

इतकेच नाही. आधार हे नागरिक असल्याचे प्रमाणपत्रच नाही (तुम्ही या भ्रमात होता, तर बाहेर या!), त्यामुळे त्याद्वारे मतदार कार्ड पडताळले जाईल ही कल्पनाच अजब आहे. कायद्यानेच गैर-नागरिकांनाही आधार कार्ड दिले गेले आहेत आणि त्यामुळे बोगस मतदार नोंदणी सुद्धा आधारद्वारे शक्य होऊ शकते. बेकायदेशीर पणे दुबार आणि तिबार आधार कार्ड काढणारे सुद्धा लोक आहेत आणि याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. माहिती अधिकाराखाली उघड झाले आहे की 2014-15 पर्यंतच जवळपास 8 कोटी बोगस आधार कार्ड काढले गेले होते! अशा लोकांद्वारे सुद्धा बोगस मतदार नोंदणी शक्य होऊ शकते. आधार आणि पॅन कार्ड लिंक केल्यावर आयकर खात्यातही बोगस नोंदी वाढल्याचे दिसून आले आहे. तेव्हा जो दावा केला जात आहे, त्याच्या ठीक उलटे घडणे सुद्धा शक्य आहे.

आधार नंबर मोबाईलशी जोडलेले आहेत, आणि तुम्ही सोशल मीडीयावर काय करता यावरून तुमचा राजकीय कल समजू शकतो, व त्यामुळे मतदारांवर नजर ठेवणेही काही प्रमाणात शक्य होऊ शकते. याही पलीकडे जाऊन सर्व माहिती संगणक तंत्रज्ञानाने एकमेकांशी अगोदरच जोडले गेलेले असल्यामुळे मतदारांच्या मतदानाबद्दल विश्लेषण करून अजून माहिती मिळवणे (व्होटर प्रोफायलिंग),

पान 14 वर

# धर्मसंसदेच्या आडून धार्मिक विद्वेषाची आग पसरवण्याचे हिंदुत्ववादी फॅसिस्टांचे पुन्हा षडयंत्र

## धर्मद्वेष नाकारा, खऱ्या मुद्यांभोवती संघटित व्हा!

✎ जयवर्धन

"मी मनमोहन सिंहांच्या छातीत सहाच्या-सहा गोळ्या झाडल्या असत्या", "हाती शस्त्र घ्या आणि धर्माचे रक्षण करा", "त्यांना मारा किंवा मारले जा", "पुस्तके ठेवा आणि शस्त्रे हाती घ्या" अशा पद्धतीची गरळ ज्या "धर्मसंसदेत" ओकली गेली ती तथाकथित "धर्मसंसद" गेल्या महिन्यात 17 ते 19 डिसेंबर दरम्यान हरिद्वार येथे काही उजव्या हिंदुत्ववादी संघटना, भाजपचे नेते, भाजपशी संबंध असलेले धर्मगुरू यांच्या प्रमुख सहभागात पार पडली. जुना आखाड्याचे महामंडलेश्वर यती नरसिंहानंद याने या "धर्मसंसदेचे" आयोजन केले होते. यात खुलेआम हाती शस्त्र घेण्याचे व मुस्लिम समाजाचा नरसंहार करण्याचे आवाहन केले गेले. नेहमीच अतिशय विखारी आणि धार्मिक सद्भावाला तडा जातील असे व्यक्तव्य करणाऱ्या धर्मगुरूंनी व नेत्यांनी इथेसुद्धा खुलेआम मुसलमानांची कत्तल करण्याची, शस्त्रे उचलण्याची व सफाया करण्याची भाषा वापरली. विदेशी मीडियातसुद्धा याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. या आयोजनात केल्या गेलेल्या भाषणांचा विषारीपणा अगदी टोकाचा होता. उदाहरणादाखल,

आनंद स्वरूप महाराज : "जर सरकार मुसलमानांविरोधात हिंसा करून हिंदू राष्ट्राची स्थापना करण्याची आमची मागणी ऐकत नसेल तर आम्ही 1857 पेक्षाही जास्त भयंकर युद्ध सुरु करू."

बिहारचा धर्मदास महाराज :"अर्धा भारत पाकिस्तान बनला आहे, सध्या भारतात 500 पाकिस्तान आहेत...जेव्हा मनमोहन सिंगांनी संसदेत म्हटले की राष्ट्रीय संसाधनांवर मुसलमानांचा पहिला अधिकार आहे तेव्हा जर मी संसदेत असतो तर नथुराम गोडसे बनून सहाच्या सहा गोळ्या मी त्यांच्यावर झाडल्या असत्या".

सागर सिंधू महाराज : "...मी परत परत सांगतो की 500 रुपयाचा मोबाइल ठेवा पण एक लाखाचे शस्त्र ठेवा. तुमच्याकडे कमीत कमी लाठी आणि तलवार तरी असली पाहीजे."

स्वामी प्रबोधानंद - "...मारण्यासाठी तयार राहा किंवा मारले जा. दुसरा पर्याय नाही. म्यानमारमध्ये केले तसेच प्रत्येक हिंदूने, पोलिसांनी, सेनेने आणि नेत्यांनी सफाई अभियान हाती घ्यावे लागेल." त्यांचा रोख म्यानमार मध्ये झालेल्या रोहिंग्या मुस्लिमांच्या कत्तलीकडे होता. 2017 मध्ये एका गाजलेल्या वक्तव्यात त्याने म्हटले होते की हिंदूंनी आठ आठ मुले पैदा करावीत जेणेकरून हिंदुत्वाला आणि समाजाला वाचवले जाऊ शकेल. 2018 ला शामली येथे तो म्हणाला की केवळ मुस्लिमच हिंदू स्त्रियांचा बलात्कार करतात.

साध्वी अन्नपूर्णा माँ उर्फ पूजा शकुन पांडे जी हिंदू महासभेची सचिव आहे. तिने सरळ सरळ मुस्लिमांची हत्या करण्याचेच आवाहन केले. ती म्हणाली, "शस्त्राशिवाय काहीच शक्य नाही. तुम्हाला त्यांना संपवायचे असेल तर त्यांना मारून टाका. मारण्यासाठी आणि जेलमध्ये जाण्यासाठी तयार रहा. जर आपल्यापैकी 100 लोक जरी 20 लाख लोकांना मारायला तयार झाले तरी आपण विजयी होऊ...धर्माला वाचवायचे असेल तर वह्या-पुस्तकांना खाली ठेवा आणि शस्त्र उचला". इतके विखारी भाषण तिने केले. ही तीच पूजा पांडे आहे जिने 2019 च्या जानेवारीमध्ये गांधींच्या फोटोला गोळ्या झाडून नथुरामचा जयजयकार केला होता. भाजपचे नेते अश्विनी उपाध्याय आणि भाजप महिला मोर्चाच्या नेत्या उदिता त्यागी सुद्धा या धर्मसंसदेत उपस्थित होत्या. अश्विनी उपाध्याय यांनी यती नरसिंहानंदांना 'भगवा संविधान' भेट दिले. त्यांच्यावर याआधीसुद्धा भडकाऊ भाषणे करण्याचे आरोप लागलेले आहेत.

विशेष म्हणजे या सर्व घटनाक्रमावर भाजपच्या इतर महत्वाच्या नेत्यांनी आणि मोदींनी कुठतेही भाष्य वा टीका केली नाही आणि यात आश्चर्याची काहीच बाब नाही. केंद्रात सत्तेत असलेल्या भाजप सरकारने नेहमीच धार्मिक उन्माद पसरवणाऱ्यांना पाठबळ दिले आहे. ते उघडपणे हे करू शकत नसले तरी आर.एस.एस. आणि त्याच्या सहयोगी कट्टरपंथी संघटनांद्वारे आणि त्यांच्या नेते व कार्यकर्त्यांद्वारे केल्या गेलेल्या विद्वेषी कारवायांना, हिंसेला व भाषणांना नेहमीच सत्तेचे अभय मिळत आलेले आहे. एकतर गुन्हाच नोंद होत नाही किंवा थातुरमातुर गुन्हा नोंद करून नंतरची कारवाई टाळली जाते व त्यांना मोकाट सोडले जाते. सरकारविरोधात लिहिलेल्या एका फेसबुक पोस्टवर तत्परतेने कारवाई करून यू.ए.पी.ए. चा खटला लावणारे पोलिस या घटनेबाबत मात्र बरेच दिवस कानात बोळे आणि तोंडावर बोट ठेऊन गप्प बसले होते. शेवटी बराच गहजब झाल्यानंतर पोलिसांनी एफआयआर दाखल केला.

या घटनाक्रमाला येत्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि व्यापकरीत्या भारतात उभ्या राहिलेल्या हिंदू फॅसिस्ट आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समजून घेणे महत्वाचे आहे. अशा पद्धतीची धार्मिक उन्माद पसरवणारी व तेढ निर्माण करणारी तसेच दंगलींना प्रोत्साहन देणारी भाषणे व वक्तव्य नेहमीच निवडणुका जवळ आल्या की वाढायला लागतात. एरवीही त्या सुरु असतातच परंतु निवडणुकांच्या काळात त्यांची भूमिका फायद्याची असते हे सत्ताधारी फॅसिस्टांना योग्य ठाऊक आहे. गेल्या अनेक निवडणुकांचा इतिहास जर आपण बघितला तर आपल्याला हे स्पष्टपणे दिसून येईल कि यापध्दतीचे हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण करून भाजपने निवडणुकांमध्ये आपला फायदा करून घेतला आहे. ते मग रामजन्मभूमीचे आंदोलन असूद्या, रथयात्रा असुद्या किंवा मुझफ्फरनगरमध्ये झालेल्या 2013 मधील दंगली असूद्यात. इतर काही नाही तर पाकिस्तान आणि बांग्लादेश व त्यानिमित्ताने मुस्लिमद्वेष यांच्या प्रचाराचे मुद्दे बनतातच. 1990 मध्ये रथयात्रा काढल्यानंतर भाजपाला अशा प्रचाराचा मतांची टक्केवारी वाढण्यात मोठा फायदा झाला. रथयात्रा ज्या ठिकाणांहून गेली तिथे दंगली घडल्या आणि अनेकांचे जीव गेले. त्यानंतर 1992 मध्ये बाबरी मशीद पाडण्यात आली. त्यानंतरही अनेक दंगली देशात झाल्या. या धार्मिक ध्रुवीकरणाचा उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांमध्ये आणि संसदेच्या निवडणुकांमध्ये भाजपने फायदा करून घेतला. हिंदू समुदायामध्ये मुस्लिमांबद्दल खोटी भीती निर्माण करायची, त्यांच्या धार्मिक आस्थेचा वापर करून तेढ वाढेल असे काहीतरी करून दंगली भडकवायच्या आणि या राजकारणासाठी भांडवलदारांनी, धन्नासेठांनी आपल्या पैशाच्या पोतड्या खाली करून रसद पुरवायची व सत्ता काबीज करायची अशा पद्धतीनेच हे सर्व चालत आहे.



या वर्षी फेब्रुवारी-मार्च मध्ये पंजाब, उत्तरप्रदेश, उत्तराखंड, गोवा, मणिपूर या राज्यांच्या आणि वर्षाच्या शेवटी हिमाचल व गुजरात राज्यांच्या विधानसभा निवडणूका आहेत. विकासाच्या सर्व आघाड्यांवर सपशेल अपयशी ठरलेल्या आणि जनतेला महागाईच्या खाईत लोटणाऱ्या मोदी आणि भाजपासमोर या राज्यांमध्ये सत्ता टिकवण्याचे वा हस्तगत करण्याचे आव्हान आहे. वर्षाला 2 कोटी रोजगाराची घोषणा करणाऱ्या मोदी सरकारच्या काळात बेरोजगारी अभूतपूर्व वाढली आहे आणि शिकलेले तरुण-तरुणी हताश आहेत. आरोग्य आणि शिक्षणव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत आणि खाजगीकरण जोरात सुरु आहे. अशा परिस्थितीत जनतेला धर्माची अफू पाजून, जनतेत हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण करून मते मिळवण्याचा आणि सत्ता काबीज करण्याचा हा डाव आहे. जनतेच्या धार्मिक आस्थेचा वापर करण्याचे, बेरोजगार युवकांना त्यांच्या समस्येचे कारण मुसलमान आहेत असे सांगून त्यांच्या हाती शस्त्र देऊन त्यांना मुसलमानांविरोधात हिंसा करण्यासाठी भडकवण्याचे हे सुनियोजित कारस्थान आहे.

एका बाजूला कामगार-कष्टकऱ्यांची पिळवणूक करून, त्यांच्याकडून 10-10, 12-12 तास काम करवून त्यांना जगण्यापुरताही मोबदला न देता हलाखीचे जीवन जगण्यास बाध्य करून, बेरोजगारांची फौज उभी करून भांडवलदार-मालक वर्ग व त्याचे सत्ताधारी प्रतिनिधी दुसऱ्या बाजूला प्रचंड चैनीचे व ऐषोआरामाचे जीवन जगत आहेत. या नफाकेंद्री भांडवली व्यवस्थेत वरच्या 10 टक्के वर्गाकडे 65 टक्के संपत्ती एकवटली आहे तर खालच्या 50 टक्के लोकांकडे एकूण संपत्तीच्या 5 टक्के संपत्ती आहे. भांडवलदारांच्या धंद्यांच्या व नफ्याच्या वाढीत येणारा कामगारवर्गाचा कुठलाही विरोध (जसे की वेतन वाढवण्यासाठी, कामाचे तास कमी करण्यासाठी, कंत्राटीकरण व खाजगीकरण रोखण्यासाठी आवाज उठविणे) त्यांना खपवून घ्यायचा नाही. ही शोषणकारी परिस्थिती अशीच टिकवण्यासाठी व कामगार-कष्टकरी जनतेला त्यांच्या खऱ्या प्रश्नांपासून भटकवण्यासाठी सत्ताधारी भांडवलदार वर्गाला नेहमीच अशा कट्टरपंथी धार्मिक विचारधारेची गरज असते आणि ती भारतात हिंदुत्वाच्या विचारधारेच्या रूपाने येथील प्रतिक्रियावादी भांडवलदार वर्गाने विकसित केली आहे. नाझी जर्मनीत हिटलरनेसुद्धा भांडवलदार वर्गाची नग्न हुकूमशाही लागू करण्यासाठी या फॅसिस्ट विचारधारेचा उपयोग केला आणि लाखो ज्यूंचा नरसंहार घडवून आणला.

या फॅसिस्ट विचारधारेला गाडून आपल्या खऱ्या समस्यांसाठी लढण्यासाठी कामगार-कष्टकरी वर्गाला आपली व्यापक एकजूट सर्व जाती धर्मांच्या भिंती झुगारून देऊन उभी करावी लागेल. इतिहासातसुद्धा कामगारवर्गानेच या भस्मासुराला (हिटलरच्या नाझी सत्तेला) त्याच्या योग्य जागी म्हणजेच थडग्यात गाडले होते. आजसुद्धा कामकरी सामान्य जनता जेव्हा महागाई, बेरोजगारी, आरोग्य आणि शिक्षणाचा अभाव, आवासाचा प्रश्न इत्यादी समस्यांनी त्रस्त आहे तेव्हा हा फॅसिस्ट भस्मासुर भांडवली सत्ताधाऱ्यांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करत आहे. आपल्या जगण्याच्या खऱ्या मुद्द्यांभोवती कामकरी जनतेची व्यापक एकजुटच आज या भस्मासुरापासून आपल्याला वाचवू शकते.

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लोर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित